RNI NO. MAHMAR/2020/84035




BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ

उपलब्ध आहे!

मिस्त्री, टाइल्स फिटर, पेंटर, कारपेंटर, प्लंबर इत्यादीसाठी खालील नंबर वर संपर्क करावा.



संपर्क मो. 8482839451

बुधवार, २८ मे २०२५ | वर्ष : ५ | अंक : १५० | दैनिक | किंमत : ₹५/-

Wednesday, 28 May 2025 | Year : 5 | Issue : 150 | Daily | Rate: Rs. 5/-

# पहिल्याच पावसात मंत्रालयात पोहचली भ्रष्टाचाराची त्सुनामी...



**मुंबई :** सोमवारी मुंबई आणि आसपासच्या परिसरात झालेल्या मुसळधार पावसामुळे मुंबईतील जनजीवन विस्कळीत झाले होते. तसेच अनेक ठिकाणी पाणी तुंबल्याने वाहतुकीचा खोळंबा झाला होता. एवढेच नाही तर काही दिवसांपूर्वीच उदधाटन झालेल्या वगळी येथील भुयारी मेट्रोच्या स्थानकातही पाणी शिरले होते, या प्रकारावरून काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी राज्यातील सत्ताधारी भाजपा आणि भाजपाच्या महायुतीमधील मित्रपक्षांना टोला लगावला आहे. पहिल्याच पावसात भाजप, शिंदे, अजित पवारांच्या भ्रष्टाचाराची त्सुनामी मंत्रालयात पोहचली, घोटाळेबाजांची चौकशी कधी करणार, असा सवाल त्यांनी सत्ताधाऱ्यांना विचारला आहे. हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, मुसळधार पावसाने भाजपा युती सरकारचे सर्व दावे फोल ठरले आहेत. कालवे फुटल्याने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा भ्रष्टाचार तसेच मुंबई तुंबल्याने एकनाथ शिंदे यांच्या पक्षाच्या भ्रष्टाचाराची त्सुनामी बाहेर पडली आहे. कोट्यवधी रुपये खर्च करुनही मुंबईत जागोजागी पाणी साचले, सर्व व्यवस्था कोलमडली. भुयारी मेट्रो मुंबईत शक्य नसल्याचा एमएमआरडीएचा अहवाल असतानाही काही लोकांच्या हट्टासाठी हा प्रकल्प राबविला त्याचे परिणाम आज दिसत आहेत. रात्रीच्या अंधारात हजारो वृक्षांची कत्तल करून मेट्रोचा अट्टाहास पूर्ण केला आहे. सत्ताधारी पक्षाचा कथित विकास एका पावसानेच उघडा पाडल्यानंतरही हे लोक आधीच्या सरकारकडे बोट दाखवून जबाबदारी झटकत आहेत. 25 वर्ष भाजपा शिवसेनेसोबत मुंबई महापालिकेत सत्तेत होती, एकनाथ शिंदे सातत्याने नगर विकास खात्याचे मंत्री आहेत, मग याकाळात भाजपा व एकनाथ शिंदे यांनी काय केले, असा प्रश्न उपस्थित करून सरकारने आरोप प्रत्यारोपाचा खेळ सोडून आत्मपरिक्षण करावे आणि जनतेला मदत करावी.



### हवामान विभागाकडून रेड अलर्ट जारी

हवामान विभागाला आश्चर्याचा धक्का देत नेहमीच्या वेळेपेक्षा आठवडाभर आधीच मान्सून महाराष्ट्रात दाखल झाला. पहिल्याच दिवशी महाराष्ट्रातील अनेक भागांना मान्सूनने झोपडपून काढले. पुढील 6-7 दिवसात पावसाचा जोर आणखी वाढणार असून, महाराष्ट्रातील काही भागात अतिवृष्टी सदृश्य ते अतिमुसळधार पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. पश्चिम किनारपट्टीवर असलेल्या महाराष्ट्रासह चार राज्यांना हवामान विभागाकडून सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. केरळ, कर्नाटक आणि किनारपट्टी आणि मध्य महाराष्ट्र आणि गोवा राज्यात पुढील 6 ते 7 दिवसांच्या कालावधीत अतिवृष्टी सदृश्य ते अतिमुसळधार पाऊस होण्याची शक्यता आहे. 27 मे ते 2 जून या काळात मध्य महाराष्ट्र, कोकण या भागात विजांच्या कडकडाटासह पाऊस होईल. या काळात 40 ते 50 किमी प्रतितास वारे वाहतील असेही हवामान विभागाने म्हटले आहे. त्याचबरोबर मराठवाड्यात 27 ते 29 मे या काळात वाऱ्यांचा वेग 50 ते 60 किमी प्रतितास इतका वाढेल असेही हवामान विभागाने म्हटले आहे.

### अतिवृष्टीमुळे नुकसान शेतकऱ्यांना हेक्टरी 50 हजारांचे अनुदान तातडीने द्या'', काँग्रेसची मागणी

**मुंबई :** राज्यातील शेतकरी संकटाचा सामना करत असतानाच मुसळधार पावसाने पुन्हा त्याला संकटात टाकले आहे. या पावसाने शेतीचे प्रचंड नुकसान झाले असून हातातोंडाशी आलेले पिकही वाहून गेले आहे. निसर्ग लहरी झाला असून राज्यातील फडणविसांचे सुलतानी सरकार शेतकरी व जनतेच्या मुळावर उठले आहे. संकटातील शेतकऱ्याला मदतीची गरज असून सरकारने पंचनाम्याचे सरकारी सोपस्कर बाजूला ठेवून नुकसानग्रस्तांना एकरी 20 हजार रुपये मदत तातडीने द्यावी, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केले आहे.

## अमेरिकेत शिक्षण घेणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांना इशारा



**नवी दिल्ली :** अमेरिकेत बेकायदा राहणाऱ्या भारतीयांविरोधात भूमिका घेतल्यानंतर आता अमेरिकन प्रशासनाने भारतीय विद्यार्थांना इशारा दिला आहे. अमेरिकन संस्थांमध्ये शिक्षण घेताना अभ्यासक्रम सोडला तर भविष्यातील व्हिसासाठी पात्रता गमावू शकता, असे अमेरिकन दूतावासाने एक्स पोस्टमध्ये म्हटले आहे. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म X वरील एका पोस्टमध्ये, भारतातील अमेरिकन दूतावासाने विद्यार्थ्यांना त्यांच्या व्हिसाच्या अटींचे पालन करण्यास आणि कोणत्याही समस्या टाळण्यासाठी त्यांचा विद्यार्थी दर्जा कायम ठेवण्यास सांगितले. 'जर तुम्ही शैक्षणिक संस्थांना न कळवता अभ्यासक्रम सोडला, लेक्चर्सना बसला नाहीत किंवा तुमचा अभ्यासक्रम सोडला तर तुमचा विद्यार्थी व्हिसा रद्द केला जाऊ शकतो आणि भविष्यातील अमेरिकन व्हिसासाठी तुम्ही पात्रता गमावू शकता. तुमच्या व्हिसाच्या अटींचे नियमित पालन करा आणि कोणत्याही समस्या टाळण्यासाठी तुमचा विद्यार्थी दर्जा कायम ठेवा', असे पोस्टमध्ये म्हटले आहे

## विधानसभा निवडणुक; उच्च न्यायालयाचा निवडणूक आयोगाला सवाल

**नागपूर :** राज्यातील विधानसभा निवडणुका आटपून सहा महिन्यांपेक्षा अधिक कालावधी उलटला आहे. मात्र निवडणुकातील निकालाबाबतचा वाद अद्यापही संपुष्टात आला नाही. विधानसभा निवडणूक गैरप्रकार झाल्याचा आरोप अनेक पराभूत उमेदवारांनी केला. यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विरोधात देखील उच्च न्यायालयात निवडणूक याचिका दाखल करण्यात आली आहे. या निवडणूक न्यायालयात प्रलंबित असतानाच उच्च न्यायालयात निवडणुकीत झालेल्या गैरप्रकाराबाबत आणखी काही रिट याचिका दाखल करण्यात आहेत. उच्च न्यायालयाने याप्रकरणावर मंगळवारी तातडीने घेतली आणि थेट केंद्रीय निवडणूक आयोगाला नोटीस बजावत तीन आठवड्यात स्पष्टीकरण देण्याचे निर्देश दिले. विधानसभा निवडणुकीशी संबंधित सीसीटीव्हीसह इतर व्हिडिओ फुटेज आणि 17 (सी) फॉर्मच्या प्रती मिळविण्यासाठी महाविकास आघाडीमधील पराभूत उमेदवार प्रफुल्ल गुडधे, गिरीश पांडव, जयश्री शेळके व महेश गणगणे यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात रिट याचिका दाखल केल्या आहेत. विधानसभा निवडणुकीत 20 नोव्हेंबर 2024 रोजी मतदान झाले व 23 नोव्हेंबर 2024 रोजी निकाल जाहीर करण्यात आला.

## व्हॉट्सअॅप चॅट्स हा ठोस पुरावा असू शकत नाही : दिल्ली न्यायालय

**नवी दिल्ली :** दिल्लीत 2020 मध्ये दंगलीदरम्यान दाखल झालेल्या पाच खून प्रकरणांमध्ये व्हॉट्सअॅप चॅट्स हा ठोस पुरावा असू शकत नाही, असा निर्णय दिल्ली न्यायालयाने दिला आहे. एवढेच नाही तर न्यायालयाने असेही म्हटले आहे की या चॅट्सचा वापर ठोस पुरावा म्हणून केला जाऊ शकत नाही. नऊ जणांच्या हत्येप्रकरणी दाखल झालेल्या नऊ गुन्ह्यांपैकी हे पाच गुन्हे आहेत. दंगलीच्या एका आठवड्यानंतर हे मृतदेह सापडले होते. उर्वरित चार प्रकरणांपैकी एका प्रकरणात आरोपीची निर्दोष मुक्तता



करण्यात आली आहे आणि तीन प्रकरणांमध्ये आरोपींचे म्हणणे ऐकूण घेतले जात आहे.

या दंगलीत एकूण 53 लोकांचा मृत्यू झाला होता आणि 500 हून अधिक लोक जखमी झाले होते. संबंधित पाचही प्रकरणांमध्ये, दिल्ली पोलीस विशेषतः 'कट्टर हिंदू एकता' नावाच्या व्हॉट्सअॅप ग्रुपच्या चॅटवर अवलंबून राहिले. पोलिसांनी दाखल केलेले आरोपपत्रामध्ये या ग्रुपच्या नावाचाही समावेश आहे. याबाबत इंडियन एक्सप्रेसने वृत्त दिले आहे.

आरोपपत्रानुसार, आरोपींपैकी एक असलेल्या लोकेश सोलंकीने एका व्हॉट्सअॅप ग्रुपवर मेसेज केला होता की, 'तुमच्या भावाने रात्री 9 वाजता 2 मुस्लिम पुरुषांची हत्या केली.' सोलंकीची चौकशी केल्यानंतर इतरांना अटक करण्यात आली. त्यांच्यावर 9 खूनांचा आरोप होता.

## रिजनरेटिव्ह ब्रेकिंग प्रणालीमुळे रेल्वेमंत्र्यांची खिल्ली

**नवी दिल्ली :** केंद्रीय रेल्वे मंत्री आश्विनी वैष्णव यांनी सोमवारी, 26 मे रोजी गुजरातमधील दाहोद येथे आधुनिक लोकोमोटिव्ह उत्पादन प्रकल्पाचे कौतुक केले. गुजरातमधील दाहोद येथे उत्पादित भारतातील पहिलं 9 हजार हॉर्सपॉवर लोकोमोटिव्ह इंजिनमध्ये रिजनरेटिव्ह ब्रेकिंग क्षमता असल्याचे त्यांनी म्हटले. यावरून नेटिझन्सने त्यांची खिल्ली उडवली आहे.



'ओव्हरहेड वायर्समधून इंजिनाला वीजपुरवठा केला जाईल. पण जेव्हा ब्रेक लावले जातील तेव्हा याच इंजिनातून वीज निर्मिती होईल आणि ती परत ओव्हरहेड वायरमध्ये परत पाठवली जाईल. हे आधुनिक तंत्राचे आश्चर्य आहे', असे आश्विनी वैष्णव म्हणाले होते. वंदे भारत ट्रेनमध्ये ही यंत्रणा वापरण्यात येत आहे. आश्विनी वैष्णव यांच्या या विधानानंतर त्यांची समाज माध्यमातून खिल्ली उडवली गेली. अनेकांना ते काय म्हणाले हे समजलंच नाही. तर काहीजण म्हणले रीलमंत्र्यांनी तारतम्य ठेवून बोलले पाहिजे. पण थोड अभ्यास केला तर असे स्पष्ट होते की आश्विनी वैष्णव जे म्हणाले त्यात तथ्य आहे. याबाबत रेल्वे मंत्रालयानेही याआधी खुलासा केला होता.वंदे भारत ट्रेनचे कोच रिजनरेटिव्ह ब्रेकिंग सिस्टमचे सुसज्ज असून इतर ट्रेनच्या तुलेनत वंदे भारत अधिक ऊर्जा कार्यक्षम आहेत, असे रेल्वे मंत्रालयाने म्हटले आहे.ट्रेनची गतिज ऊर्जा मंदावताना रिजनरेटिव्ह ब्रेकिंग प्रणाली ही ऊर्जा कॅप्चर करते आणि या ऊर्जेचा पुनर्वापर करते. पारंपरिक ब्रेकिंग सिस्टिममध्ये सामान्य असलेली ही ऊर्जा उष्णता म्हणून वाया घालवण्याऐवजी रिजनरेटिव्ह ब्रेकिंग इलेक्ट्रिक मोटर्समधील प्रवाह उलट करते, गतिज ऊर्जेचे विद्युत ऊर्जेमध्ये रुपांतर करताना प्रभावीपणे ट्रेनची गती कमी करते. ही वीज नंतर पॉवर ग्रीडमध्ये परत पाठवली जाते.

## विदर्भातील आणखी एक न्यायाधिश सर्वोच्च न्यायालयात ...

**नागपूर :** न्या. भूषण गवई यांनी 14 मे रोजी सरन्यायाधीशपदाची शपथ घेतली. न्या. गवई हे विदर्भातील अमरावती जिल्ह्यातून येतात. सरन्यायाधीशपदाची शपथ घेतल्यावर अगदी दोन आठवड्याच्या कालावधीत विदर्भातील आणखी एक न्यायाधिश सर्वोच्च न्यायालयात न्यायमूर्ती पदापर्यंत पोहोचले आहे. मुंबई उच्च न्यायालयातील वरिष्ठ न्यायाधिश अतुल चांदूरकर यांच्या





रूपाने विदर्भाचे आणखी एक प्रतिभासंपन्न सुपुत्र सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती पदी विराजमान होणार आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या कॉलेजियमने सोमवारी न्यायमूर्ती चांदूरकर यांच्यासह कर्नाटक उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधिश एन. व्ही. अंजरिया व गुवाहाटी उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती विजय बिश्नोई यांची सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती पदी नियुक्ती करण्याची शिफारस केंद्र सरकारला केली.

यापूर्वी विदर्भातून न्या. मोहम्मद हिदायतुल्ला, न्या. जनार्दन मुधोळकर, न्या. ए.पी. सेन, न्या. विकास सिरपूरकर, न्या. शरद बोबडे व न्या. भूषण गवई यांची सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती पदी नियुक्ती झाली आहे. यापैकी न्या. हिदायतुल्ला व न्या. बोबडे यांनी सरन्यायाधीश पदही भूषविले व सध्या न्या. गवई सरन्यायाधीश पदी कार्यरत आहेत. न्या. चांदूरकर यांचा जन्म 7 एप्रिल 1965 रोजी भुसावळ येथे झाला. त्यांचे वडील शरच्चंद्र चांदूरकर विदेश संचार निगमचे अधिकारी होते. त्यामुळे त्यांनी पुणे येथील सेंट व्हिन्सेंट हायस्कूलमधून शालेय शिक्षण व नेस वाडिया महाविद्यालयातून पदवी शिक्षण पूर्ण केले, तर आयएलएस विधि महाविद्यालयातून एलएल. बी. पदवी प्राप्त केली. त्यानंतर त्यांनी 21 जुलै 1988 पासून मुंबई येथे वरिष्ठ अॅड. बी.एन. नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली वकिली व्यवसायाला सुरुवात केली. अॅड. नाईक पुढे चालून उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती झाले.

## सर्वोच्च न्यायालयाचा बलात्कार आरोप प्रकरणात महत्त्वपूर्ण निकाल

**नवी दिल्ली :** बलात्काराचा आरोप असणाऱ्या एका प्रकरणात उच्च न्यायालयाने दिलेला निकाल फिरवत सर्वोच्च न्यायालयाने आरोपीची निर्दोष मुक्तता केली आहे. न्यायमूर्ती बी.व्ही. नागरत्ना व न्यायमूर्ती एस.सी. शर्मा यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. या सुनावणीदरम्यान 25 वर्षीय आरोपीच्या



बाजूने निकाल देत न्यायालयाने त्याची निर्दोष मुक्तता केली. सहमतीने झालेल्या शरीरसंबंधांना नाते तुटल्यानंतर बलात्कार म्हणता येणार नाही, असं न्यायालयाने यावेळी स्पष्ट केले.

मुंबई उच्च न्यायालाने बलात्कार प्रकरणात एका 25 वर्षीय आरोपीला दोषी मानून त्याला शिक्षा सुनावली होती. या निर्णयाविरोधात आरोपीने सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली होती. या याचिकेवर सुनावणी घेत न्यायालयाने आरोप करणाऱ्या महिलेच्या वकिलांनाही सुनावले आहे.

***'सहमतीने लैंगिक संबंध झाल्यानंतर जर नाते तुटले, तर त्याला बलात्कार म्हणता येणार नाही.*** या आधारावर संबंधित व्यक्तीवर बलात्कारासाठीची कारवाई करता येणार नाही. अशा प्रकारच्या खटल्यांमुळे फक्त न्यायालयांवरील ताणच वाढत नाही, तर संबंधित व्यक्तीवर इतक्या गंभीर आरोपांमुळे त्याची मानहानीही होते. या न्यायालयाने वारंवार हे स्पष्ट केले आहे की कोणत्याही प्रकारे कायद्याचा गैरवापर होता कामा नये', असे न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

यासंदर्भात दाखल झालेल्या गुन्ह्यातील तरतूदी खऱ्या आणि वास्तव कथन करणाऱ्या मानल्या, तरी त्यातून हे सिद्ध होत नाही की लैंगिक संबंधांसाठीची सहमती सदर तरुणीच्या इच्छेविरुद्ध आणि फक्त विवाहाच्या आश्वासनावर घेण्यात आली होती', असे न्यायालयाने निकालात म्हटले.






# काँग्रेसची आसाममध्ये नवी खेळी

### गौरव गोगोईंची प्रदेशाध्यक्षपदी निवड

**दिसपूर :** विधानसभा निवडणुकांआधी गौरव गोगोई यांनी त्यांचे वडील आणि काँग्रेसचे तरुण गोगोई यांच्या नेतृत्वाखाली सक्रियपणे राजकारणात प्रवेश केला. पक्षात त्यांची प्रतिमा लोकप्रिय झाल्यानंतर सरमा यांनी हुकूमशाही आसाममध्ये काँग्रेसने विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्यात पक्षनेतृत्वासाठी तरुण चेहऱ्याची निवड केली आहे. काँग्रेसने सोमवारी गौरव गोगोई यांची प्रदेशाध्यक्षपदी निवड केली आहे. लोकसभेच्या विजयानंतर गौरव गोगोई यांना नवीन अध्यक्षपदाची जबाबदारी सोपवताना काँग्रेसने मुख्यमंत्री हिमंता सरमा यांना खुलं आव्हान दिले आहे. सरमा आणि गोगोई यांच्यामध्ये आधीपासूनच वाद आहेत. तसंच गेल्या काही महिन्यांपासून त्यांच्यात शाब्दिक युद्धही सुरू आहेच.

जोरहाटचे खासदार गौरव गोगोई आसाममधील विधानसभा निवडणुकीच्या बरोबर एक वर्ष आधी आणि पक्षाची परिस्थिती डळमळीत असताना हा पदभार स्वीकारत आहेत. यावेळी सरमा यांनी त्यांच्या विरोधात जोरदार प्रचार केला होता. गेल्या वर्षी झालेल्या महत्त्वाच्या विधानसभा पोटनिवडणुकांमध्ये काँग्रेसने पाचही जागा गमावल्या आणि अलीकडच्या पंचायत निवडणुकीतही त्यांची कामगिरी निराशाजनक झाली.

गोगोई यांच्या नियुक्तीव्यतिरिक्त काँग्रेसने तीन कार्यकारी अध्यक्षांचीही नियुक्ती केली आहे. सारुखेत्रीचे आमदार जाकीर हुसेन सिकदर, सरूपथरचे माजी आमदार रोसेलिना तिर्के आणि अभयपुरी दक्षिणचे आमदार प्रदीप सरकार. सिकदर हे बंगाली वंशाचे मुस्लीम आहेत, तर तिर्के हे आसाममधील चहाच्या व्यवसायातील टोळीचे नेते आहेत आणि सरकार हे बंगाली हिंदू आहेत. हे सर्व जण राज्यातील मतदान करणाऱ्या लोकसंख्येचे प्रतिनिधित्व करतात.

> " आसाममधील काँग्रेस पक्षातील इतक्या समर्पित आणि प्रेरणादायी ज्येष्ठ नेत्यांसोबत आणि कार्यकर्त्यांसोबत काम करणे हा एक आशीर्वादच आहे. त्यांच्या अनुभवाने आणि पक्षाप्रती असलेल्या समर्पणाने मला अनेक गोष्टी शिकवल्या आहेत. जोई ऐ एक्सोम! जय हिंद!
>
> – गोगोई

राज्यातील प्रचार समितीचा कार्यभार माजी काँग्रेस अध्यक्ष भूपेन कुमार बोराह यांच्याकडे आणि समन्वय समितीचा कार्यभार विरोधी पक्षनेते देबब्रत सैकिया यांच्याकडे देण्यात आला आहे. काँग्रेसने नागावचे खासदार प्रद्युत बोरदोलोई यांना जाहीरनामा समितीचे अध्यक्ष म्हणून नियुक्त केले आणि प्रचार समितीची जबाबदारी मोहम्मद रकीबुल हुसेन यांच्याकडे दिली आहे.

एक्सवरील एका पोस्टमध्ये 41 वर्षीय गोगोई यांनी काँग्रेसच्या उच्च नेतृत्वाचे या नियुक्तीबद्दल आभार मानले आहेत.

> " एक म्हणजे तरुण मतदारांना त्यांचे आवाहन, तर दुसरे म्हणजे त्यांच्यावर भ्रष्टाचाराचा कोणताही कलंक नाही. गेल्या काही वर्षांत अनेक नेत्यांनी केलेल्या पक्षबदलामुळे लोकांना नेत्यांच्या निष्ठा आणि प्रामाणिकपणाबद्दल शंका आहे. मुख्यमंत्र्यानी गोगोई यांच्याविरोधात हे असेच काहीसे शस्त्र उगारले. यावरून असे दिसून येते की, काँग्रेसचा हा किंवा तो नेता प्रत्यक्षात भाजपाशी संगनमत करून काम करत असावा. मात्र, आसामच्या लोकांना विश्वास आहे की गौरव गोगोई काँग्रेस आणि त्यांच्या भाजपाविरोधी भूमिकेशी समन्वय साधून राहतील.
>
> – काँग्रेस नेता

सैकिया आणि बोरदोलोई यांना पीसीसी (प्रदेश काँग्रेस समिती) प्रमुखपदासाठीचे प्रमुख दावेदार म्हणून पाहिले जाते. आसाममधील एका वरिष्ठ काँग्रेस नेत्याने सांगितले की, पक्षाच्या एका मोठ्या गटाने गोगोई यांना आसाममध्ये अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेण्यासाठी आग्रह धरला होता.

'कार्यकर्त्यांमध्ये आणि भाजपाच्या विरोधी पक्षांमध्ये अशी धारणा आहे की, गोगोई सरमा आणि त्यांच्या पक्षाला तोंड देऊ शकतात. ते एक कुशल संघटक असल्याचे सिद्ध करतील की नाही हे वेळच सांगेल', असे एका काँग्रेस नेत्याने सांगितले.

## वाचकांना आवाहन



दैनिक बहुजन सौरभची नागपूर शहरात सतत मागणी वाढत आहे. आपल्या घरी जो पेपर देतो. त्यांच्याकडे दैनिक बहुजन सौरभची मागणी करावी. आमच्या वर्तमानपत्राची स्वतंत्र अशी कोणतीही वितरण व्यवस्था नाही.

बहुजन सौरभ

दैनिक बहुजन सौरभ नागपूर शहरात सर्वच पेपर विक्री केंद्रावरती उपलब्ध आहे. याची वाचकांनी नोंद घ्यावी.

मुख्य संपादक

दैनिक बहुजन सौरभ

## संपादकीय

# रोजगार व शिक्षणाच्या संधीअभावी तरूणांचा दहशतवादाकडे कल

दहशतवाद हा आज केवळ एखाद्या राष्ट्राचा शत्रू नाही, तर संपूर्ण मानवतेसाठी एक भयाण आव्हान बनला आहे. तो केवळ रक्तपात घडवत नाही, तर मनामनांत भीती पेरतो, समाजाच्या एकतेला सुरूंग लावतो आणि लोकशाही मूल्यांवर घाला घालतो. निष्पाप जीवांचे बळी घेत, तो दररोज माणुसकीला रक्तबंबाळ करतो. दहशतवादाने भारतीय लोकशाहीला खोल जखमा दिल्या आहेत. मात्र, ही केवळ मेणबत्ती जाऊन श्रद्धांजली वाहण्याची औपचारिकता न राहता, सजगतेची, विवेकनिष्ठतेची आणि मानवी शपथ घेण्याचे प्रेरणा ठरावे. दहशतवादाला कोणताही धर्म, जात किंवा सामान्य राष्ट्रप्रेम नसते. त्याला असतो फक्त द्वेषाचा चेहरा आणि हिंसेची तहान. दहशतवादावर पोसलेली पाकिस्तानसारखी राष्ट्र जर का त्याला पाठिंबा देत असतील, तर ही लढाई केवळ शस्त्रांनीच नव्हे, तर विवेक, विज्ञाननिष्ठा आणि लोकशाही मूल्यांच्या बळावर लढली गेली पाहिजे. कारण दहशतवाद हा केवळ शस्त्रांनी लढण्याचा शत्रू नाही. तो विषमताजन्य, अज्ञानप्रसूत आणि तिरस्काराने पोसलेल्या विचारसरणीचा परिणाम आहे. म्हणूनच त्याला रोखण्यासाठी बंदूक इतकेच प्रभावी शस्त्र म्हणजे जागरूकता, सहिष्णुता, विवेक आणि मानवमूल्यांवर आधारित सामाजिक बांधिलकी जागृत असणे आवश्यक आहे. केवळ भूतकाळाच्या आठवणींना उजाळा देण्याची, सजगतेची आणि विवेकनिष्ठ कृतीची शपथ घेतली पाहिजे. भविष्याच्या सुरक्षेसाठी सुसंस्कृत, समजूतदार आणि सशक्त समाज उभा करण्याची प्रेरणा मिळाली पाहिजे. दहशतवाद विरोधी काळा इतिहास भारतीय लोकशाहीवर कोरल्या गेलेल्या दुःखद आणि क्रुर आठवणींचा संदर्भबिंदू आहे. दहशतवादाच्या विळख्यातून मुक्त होण्यासाठी जनजागृती आवश्यक आहे, हे जाणून भारत सरकारने दहशतवाद या विकृत प्रवृत्तींमुळे समाजात धार्मिक, जातीय, प्रादेशिक आणि सांस्कृतिक दुहीचे वादळ निर्माण होते आणि त्यातून सामाजिक एकतेच्या शक्यताच कोलमडू लागतात. ही प्रक्रिया समाजाला आतून पोखरत जाते, जी केवळ राजकीय व्यवस्थेलाच नव्हे, तर लोकशाही मूल्यांनाही गालबोट लावणारी ठरते. भारताला गेल्या काही दशकांत दहशतवादाच्या अनेक भीषण आणि रक्तरंजित प्रहारांना सामोरे जावे लागले आहे. 1993 मध्ये मुंबईतील विनाशकारी बॉम्बस्फोट, 2001 मध्ये भारतीय संसदेवर झालेला हल्ला, 2008 मधील 26/11 चा मुंबईवरील दहशतवादी हल्ला, 2019 मधील पुलवामामधील आत्मघातकी हल्ला आणि अलीकडील पहलगाममधील हल्ला हे सर्व देशाच्या सामूहिक स्मृतीवर कोरलेल्या वेदनादायी जखमा आहेत. भारत आणि संपूर्ण जगात दहशतवादाने केवळ पारंपरिक संघर्षक्षेत्रातच नव्हे, तर सायबर विश्वातही घुसखोरी करून नव्या प्रकारे भीती आणि अस्थिरता पसरवली आहे. सोशल मीडियावरून फेक बातम्या, धार्मिक तिरस्कार पसरवणे, ऑनलाइन कटकारस्थाने आणि मानसिक मोहिमा यांसारख्या आधुनिक स्वरूपांद्वारे दहशतवाद नवीन रूपात उगम पावत आहे. दहशतवादी संघटनांनी तरुण मनावर भीतीची आणि वैमनस्याची बीजे रोवून, त्यांच्या मनावर अधीनता निर्माण करण्याचा धोका निर्माण केला आहे. त्यामुळे, मूल्याधारित शिक्षण, विवेकपूर्ण विचारसरणी आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव ही तरुण पिढीपर्यंत पोहोचविणे काळाची गरज बनली आहे. जागतिक पातळीवर, अमेरिकेतील 9/11चा हल्ला, फ्रान्समधील हल्ला तसेच इस्त्रायल-पॅलेस्टाइन संघर्ष यांसारख्या घटनांनी दहशतवादाचा भयानक चेहरा उजेडात आणला आहे. संयुक्त राष्ट्रसंघ, इंटरपोल आणि इतर आंतरराष्ट्रीय सुरक्षा संस्था या समस्येवर प्रभावी नियंत्रणासाठी कटिबद्ध आहेत. भारतानेही या आंतरराष्ट्रीय प्रयत्नांना ठोस पाठबळ दिले असून, दहशतवादाविरुद्धच्या जागतिक मोहिमांचा भाग म्हणून आपली जबाबदारी पार पाडत आहे. दहशतवाद विरोधात कठोर कायदे आणि प्रभावी अंमलबजावणी गरजेची आहे. यासाठी सुरक्षा दलांची क्षमता वाढवणे, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे आणि गुप्तहेर संस्थांचा समन्वय मजबूत करणे आवश्यक आहे. आंतरराष्ट्रीय सहकार्यही महत्त्वाचे आहे. समाजाने एकत्रित येऊन दहशतवादाला विरोध करावा. धार्मिक आणि सामाजिक भेद मिटवून एकात्मता वाढवावी तसेच दहशतवादी कारवायांची माहिती पोलिसांना द्यावी. बेरोजगारी आणि गरिबीमुळे तरुण दहशतवादाकडे वळू शकतात, त्यामुळे रोजगार आणि शिक्षणाच्या संधी वाढवणे गरजेचे आहे. सरकारने सामाजिक विकास योजना राबवून गरजू लोकांना मदत करावी आणि कुटुंब, शाळा व स्थानिक संस्था यांच्यात समन्वय वाढवून समाज स्थिर ठेवावा. अशा उपाययोजनांमुळे दहशतवादाचा प्रभाव कमी होऊन सुरक्षित समाज तयार होईल. दहशतवादाला रोखण्यासाठी कायद्याचा आदर, सामाजिक जागृती, तंत्रज्ञानाचा योग्य वापर आणि शांतताप्रिय वृत्ती आवश्यक आहे. प्रत्येक नागरिकाने देशभक्ती आणि शांततेचा संदेश पसरवून दहशतवादाचा ठोस प्रतिकार करावा लागेलच. ■ ■

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जागतिक प्रेरणास्थान आणि विचारप्रवाह...

**प्रत्येक देशात असे महापुरुष होऊन गेले आहेत ज्यांनी मानवतेला एक नवीन दिशा दिली आणि सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि राजकीय विकासात अग्रणी भूमिका बजावली. या महापुरुषांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देखील समाविष्ट आहे. बहुतेक देशांमधील समाजाच्या सर्व घटकांतील दलित वंचित सीमांत राहणारे लोक त्यांच्याकडून प्रेरणा घेतात. त्यांची जयंती जवळजवळ 150 देशांमध्ये साजरी केली जाते. अलिकडेच, अमेरिकेचे न्यूयॉर्कचे महापौर एरिक अडम्स यांनी जाहीर केले आहे की दरवर्षी 14 एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर दिन साजरा केला जाईल.**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीनिमित्त जगभरात अनेक उत्सव, चर्चासत्रे, परिसंवाद इत्यादींचे आयोजन केले जाते, तर दुसरीकडे, भारतीय समाजात आंबेडकरवाद आणि त्यांच्या योगदानाला कमी लेखण्याचे प्रयत्न केले जात आहेत. आंबेडकरी विचारसरणीला विरोध करणाऱ्यांकडून आंबेडकरी पुतळ्यांची विटंबना करण्याच्या घटनाही घडल्या आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर (14 एप्रिल, 1891 - 6 डिसेंबर, 1956) हे भारतीय संविधानाच्या मसुदा समितीचे अध्यक्ष, एक प्रसिद्ध वकील, भारताचे पहिले कायदा आणि न्यायमंत्री, भाषाशास्त्रज्ञ, राजकारणी, अर्थशास्त्रज्ञ, पत्रकार, जातिवाद आणि अस्पृश्यता निर्मूलनाचे प्रेरणादायी प्रणेते, वंचित वर्गाचे मसीहा आणि असमानतेविरुद्धच्या चळवळीचे समर्थक होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते, महिलांच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय सक्षमीकरणाशिवाय समाज सुधारू आणि विकसित होऊ शकत नाही. आंबेडकरवाद किंवा आंबेडकरांचे विचारसरणी हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वेळोवेळी वर्तमानपत्रे, पुस्तके, भाषणे, संविधान सभेतील वादविवाद इत्यादी विविध मुद्द्यांवर व्यक्त केलेल्या विचारांचे पद्धतशीर स्वरूप मानले जाते. आंबेडकरवादाची विचारसरणी जगातील राजकारण्यांपासून ते समाजाच्या सीमांत असलेल्या लोकांपर्यंत सर्वांना प्रेरणा मार्गदर्शन करते. आंबेडकरवाद हा विचारांचा एक संच आहे ज्यामध्ये समता समानता, स्वातंत्र्य, सामाजिक, आर्थिक, राजकीय न्याय, मानवी प्रतिष्ठा, धर्मनिरपेक्षता, लोकशाही, समाजवाद आणि दलित, आदिवासी, महिला, शेतकरी आणि शेतमजूर, कामगार या वंचित वर्गांचे सक्षमीकरण आणि अन्न, निवारा, वस्त्र, शिक्षण, आरोग्य, काम करण्याचा अधिकार आणि समान कामासाठी समान वेतन या



मूलभूत गरजा पूर्ण करणाऱ्या समतावादी समाजाची स्थापना यांचा समावेश आहे. आंबेडकरी विचारसरणी महत्त्वाच्या उद्योगांवर सार्वजनिक नियंत्रण (राष्ट्रीयीकरण) असले पाहिजे या दृष्टिकोनाचे समर्थन करते. अशा परिस्थितीत, ही विचारसरणी या युगात प्रचलित असलेल्या उदारीकरण, खाजगीकरण, जागतिकीकरण आणि कॉर्पोरेटायझेशनच्या विरोधात आहे. समाजवादी विचारवंतांमध्ये डॉ. आंबेडकरांचे स्थान महत्त्वाचे आहे. आंबेडकरवाद अशा समाजाची कल्पना करतो. ज्यामध्ये जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात प्रत्येक व्यक्तीचे मूल्य समान असेल आणि जन्म, जात, प्रदेश, धर्म, भाषा आणि लिंग इत्यादी संकुचिततेवर आधारित नसेल. भारतातील विविधता पाहता, आंबेडकरवाद, सामाजिक सुसंवाद आणि एकता राखण्यासाठी 'विविधतेत एकता' या तत्त्वाचा पुरस्कार करतो. आंबेडकरवाद सामाजिक असमानता, अन्याय, अस्पृश्यता, जातीयवाद, सरंजामशाही, भांडवलशाही, नोकरशाहीची जनविरोधी वृत्ती, बहुसंख्यक हुकूमशाही, हिंसक चळवळी, धर्म-आधारित किंवा धर्म-प्रधान राज्यांविरुद्ध आहे. आंबेडकरवादानुसार, जातिवादामुळे निर्माण होणारी अस्पृश्यता संकुचित, फुटीर आणि अमानवी आहे. जे देशाच्या राष्ट्रीय एकता, एकात्मता आणि विकासात अडथळा आहे. आंबेडकरवादानुसार, दलित वर्गाला अस्पृश्यतेमुळे अपमान सहन करावा लागत असे. सामाजिक क्रांतीशिवाय शोषण, असमानता आणि अपमानास्पद वर्तन संपणार नाही. अशी त्यांची ते जातिव्यवस्थेच्या उच्चाटनाचे पुरस्कर्ते होते. आंबेडकरवादासमोरील प्रमुख आव्हाने म्हणजे भेदभाव आणि सामाजिक असमानता, राजकारणात नायकपूजा, जातीयवाद, अनुसूचित जाती आणि जमातींवरील गुन्हे, हिंसाचार, अमानवी घटना, जात आणि रंगाच्या आधारावर वाढणारे अत्याचार, प्रशासनातील पक्षपात आणि आर्थिक असमानता इत्यादी आव्हाने आ वासून उभी आहेत. भारतीय संविधानाच्या अंमलबजावणीच्या संदर्भात, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजातील विरोधाभासांवर प्रकाश टाकताना म्हटले होते की, '26 जानेवारी 1950 रोजी आपण विरोधाभासांच्या जीवनात प्रवेश करणार आहोत.' राजकारणात आपण एक व्यक्ती, एक मत आणि एक मत, एक मूल्य हे तत्व ओळखू. परंतु सामाजिक आणि आर्थिक जीवनात, आपल्या सामाजिक आणि आर्थिक रचनेमुळे, आपण एक व्यक्ती, एक मूल्य या तत्त्वाला नाकारत राहू. आपण किती काळ विरोधाभासांचे जीवन जगत राहणार आणि सामाजिक आणि आर्थिक जीवनात समानता नाकारणार? जर आपण हे जास्त काळ नाकारत राहिलो तर आपण आपल्या राजकीय लोकशाहीला धोका निर्माण करू. आपल्याला हा विरोधाभास लवकरात लवकर दूर करायचा आहे...' आंबेडकरवादानुसार, वेगवेगळ्या जाती, धर्म, संस्कृती, प्रदेश आणि वेगवेगळ्या भाषा बोलणाऱ्या लोकांमध्ये सद्भावना आवश्यक आहे. भारताची विशालता आणि विविधता लक्षात घेऊन, 'विविधतेत एकता' या आधारावर राष्ट्र उभारणीची प्रक्रिया मजबूत केली जाऊ शकते. आंबेडकरवाद सध्याच्या व्यवस्थेला पर्याय म्हणून दारिद्र्य, भूक, बेरोजगारी आणि निरक्षरतामुक्त समतावादी समाज स्थापन करण्याचा पुरस्कार करतो; सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्याय; प्रमुख उद्योगांवर सार्वजनिक नियंत्रण; संपत्तीचे विकेंद्रीकरण आणि उपेक्षित घटकांचे सक्षमीकरण महत्त्वाचे आहे. ■ ■

विकास मेश्राम
मो. 7875592800

# स्त्री शुद्रातीशुद्रांना धार्मिक स्थळी मज्जाव

वर्षापूर्वी शबरीमला देवस्थानात स्त्रियांना प्रवेश नाकारण्यात आला, त्या घटनेचा अनेक स्तरातून मोठ्या प्रमाणात निषेधही करण्यात आला. काल-परवा राम नवमीच्या दिवशी एक लोकप्रतिनिधी राममंदिरात गेले असता त्यांना मंदिरात प्रवेश नाकारण्यात आला. सोवळे आणि जानवे घातले नसल्याच्या सबबीखाली प्रवेश नाकारण्यात आला. या घटनेची व्हायची ती निषेधार्थ चर्चा होऊन गेली. कधी स्त्रियांना तर कधी शुद्रातिशुद्रांना निम्न जातीय मानून अपमानास्पद वागणूक मिळत असते. ही जातीवादी मानसिकता येते कुठून? कुठल्या एका जातीचे तोंड पाहू नये. त्या जातीच्या व्यक्तीचे तोंड पाहणे अशुभ! अशी एखाद्या जातीची मानखंडना! माणसामाणसामधील किती अमानवीय व्यवहार दर्शवित असते. भयंकर अपमानास्पद. कुठून येते एवढी हिंमत मंदिरातील चिल्लर माणसामध्ये एखाद्या लोकनियुक्त नेत्याचा मंदिरात प्रवेश अडवण्यासाठी? मनुवादी व्यवस्थेने जी जातीद्वेषाची पेरणी करुन ठेवली त्याचीच ही उपज आहे की, आजही जातीभेदाचा व्यवहार दिसून येतात. वरवर लोकशाही, समता, बंधुभाव, संविधान स्विकारले म्हणून नौटंकी करुन 'जातीयता संपली' असे सांगायचे आणि 'धर्माभिमान हेच राष्ट्रप्रेम' या जाळ्यात हिंदूंमधील मध्यम-मागासवर्गीय समाजाला अडकवायचे! मग धर्मस्वातंत्र्यावर घाला घालणाऱ्या अशा घटनांचा अर्थ काय? 'आता कुठे जातीयता राहिलेली आहे?' 'अस्पृश्यता कुठे राहिलेली आहे?' असे समजणाऱ्या भाबड्या लोकांनी या घटनेचा कसा अर्थ लावायचा?

लोकांच्या धार्मिक स्वातंत्र्याचा आविष्कार ठरलेली मंदिर प्रवेश आंदोलने ऐतिहासिक आहेत. चातुर्वर्ण्य चौकटीत हीन मानण्यात आलेल्या स्त्रिया आणि शूद्र-अतिशूद्र यांचे हक्क नाकारले, त्या विषम व्यवस्थेविरुद्ध लढ्याचा एक भाग म्हणजे ही आंदोलने. मानवी अधिकार, धार्मिक कर्तव्य, समता, न्याय मूल्यांसाठी आणि जातीय विषमतेला विरोध या दृष्टीने स्त्रि शुद्रांतिशुद्रांना धार्मिक स्थळी प्रवेश मिळावा यासाठी आंदोलनाचा प्रदीर्घ इतिहास आहे. अंबाबाई देवस्थान असो की, नाशिकच्या काळाराम मंदिरात प्रवेश मिळावा यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वातील काळाराम सत्याग्रह, साने

# राजकीय सत्तेपक्षा धार्मिक सत्ता श्रेष्ठ ?



गुरुजी पंढरपूरच्या मंदिरप्रवेश कारणाने उपोषण करतात, तर महात्मा गांधी यांना कन्याकुमारी येथील भगवती अम्मान मंदिरात प्रवेश नाकारण्यात आला असता ते मंदिर प्रवेश आंदोलन करतात. स्त्रिशुद्रातिशुद्रांना धर्मस्थळी प्रवेशास मनाईचे असे कैक प्रसंग, घटना आणि त्याविरुद्ध उभे राहिलेले तितकेच लोकप्रिय स्वाभिमानाचे लोकलढे. आजही अस्पृश्यता प्रश्नाची दाहकताच सांगत असतात. महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी, विठ्ठल रामजी शिंदे, साने गुरुजी, डॉ. पंजाबराव देशमुख आणि इतर समाजसुधारकांनी धार्मिक स्वातंत्र्याचा हा प्रश्न ऐरणीवर आणून समाजमन जागे केले.

परिणामतः मंदिर प्रवेश खुला झाला. पण पुरोहितशाहीची धर्मसत्तेवरील पकड सैल झाली का? शबरीमला मंदिरात स्त्रियांना प्रवेश का नाकारण्यात येतो? लोकप्रतिनिधींना प्रवेश का नाकारण्यात येतो? हे समजून घेण्यासाठी या देशातील समाजव्यवस्था समजून घ्यावी लागेल.

आता ज्या खासदारांना मंदिरात प्रवेश नाकारण्यात आला ते तेली जातीचे आहेत. ते जर जानवे घालणाऱ्या जातीचे असते तर? धर्मशास्त्राने जानवे घालण्याचा अधिकार कोणत्या जातीला दिला? म्हणजे खासदार जे लाखो लोकांचे प्रतिनिधित्व करतात, त्याचा अपमान एक जानवेधारी करु शकतात. ही धर्मशास्त्रानी मारुन ठेवलेली मेख याप्रसंगी दिसून येते. वर्णव्यवस्था ही खालच्या शुद्रांनी उच्च वर्णीयांची सेवा करणे म्हणजे धर्म होय असेच सांगते. पिढ्यानपिढ्या त्याच व्यवस्थेत बंदिस्त. 85टक्के स्त्रिशुद्रातिशुद्रांना गुलामीत ठेवण्यासाठी रचलेले षडयंत्र म्हणजे वर्णधर्म. अपमानास्पद वागणूक त्याचे फलित.

तेली समाजाची संख्या मोठी असल्याने निव्वळ राजकारण आणि मताचा हिशेब येते तेव्हा तेली आठवते, जय संताजी तिथपर्यंतच उरते. तेली समाजाच्या अस्मितेसाठी, सन्मानासाठी समाजबांधव उभे राहत नाही. त्याचा हा परिणाम राजकीय नेतृत्व कितीही मोठे झाले तरी ते चातुर्वर्ण्य चौकटीत शुद्रच ठरते. धर्मशास्त्र श्रुती स्मृतींनी ते माथी मारले आणि मग 'गर्व से कहो हम...' म्हणत असताना धर्मांध शक्तीच्या झोलझालात समाज नाडला जातो. आम्ही विसरलो की, त्याठिकाणी आमची जात नीच मानली आणि त्याच गोष्टीत गर्व करण्याला आम्हास बाध्य केले...

एवढा मोठा अवाढव्य संख्येने असलेला कष्टाळू, स्वावलंबी, इमान राखणारा तेली समाज स्वाभिमानी लढ्यासाठी उभा होईल का? या समाजातील सुशिक्षित बांधव आत्मसन्मानासाठी उभे होतील का? तेली समाजाचा स्वाभिमानाच्या लढ्याचा दैदीप्यमान इतिहास आहे.



अनुज हुलके,
9823883541

स्वातंत्र्योत्तर काळात मागील पाच सहा-दशकात तेली समाजाने अनेक लढे लढले, विशेषतः तेली समाजाला हीन लेखणाऱ्या प्रवृत्ती विरोधातील हे अस्मितेचे लढे समाजाला नवी चिकित्सक ऐतिहासिक दृष्टी देणारे ठरले. पाठ्यपुस्तकातील धडा प्रेमाचा प्रकाश, मनुस्मृती, सहदेव भाडळी ग्रंथ, निर्णयसागर कॅलेंडर इ. ठिकाणी तेली समाजाला हीन लेखले. त्याविरुद्ध तेली समाजाने मोठी आंदोलने केलीत. विदर्भ तेली समाज महासंघाने तेली समाजाला हीन लेखणाऱ्या जातीवादी प्रवृत्तीविरुद्ध सातत्याने अनेक आंदोलने करुन तेली समाजाची अस्मिता जागी केली. तेली समाजाला हीन लेखणाऱ्या प्रवृत्ती विरोधात रस्त्यावर आणि विधिमंडळापर्यंत लढा दिला. विदर्भ तेली समाज महासंघाची चळवळ तेली समाजात दूरवर पसरलेली असताना तेली समाजाच्या अस्मितेसाठी लाखोंच्या संख्येने महामेळावे आयोजित करण्यात आलेत. तेली समाजाची भरीव शैक्षणिक वाटचाल सामाजिक अस्मिता आणि राजकीय प्रभाव कमालीचा दिसू लागला. देवळी येथील ऐतिहासिक महामेळावा मा. रामदास तडस यांच्या राजकीय जीवनाला निर्णायक वळण देणारा ठरला. वर्धा लोकसभा क्षेत्राची सेवा करताना दोनदा खासदार होण्याचा बहुमान लाखो लोकांनी दिला, अशा या लोकप्रतिनिधीचा मंदिर प्रवेश नाकारणारा उच्चजात अहंकारी पुरोहितशाहीचा ठेकेदार, एकटा दिसत असला तरी तो एकटा अजिबात नाही. आम्ही म्हतो तोच धर्म, आम्ही सांगू तिच धर्मस्थळ संहिता असा पुरोहितशाहीचा मुजोर नखरा अनुभवास आला. 'महिला प्रवेश वर्जित' असा जाहीर अपमान करणारे फलक लावून त्यांची मुजोरी दिसून येते आणि लोक हे सहन करतात. स्त्री कितीही शिकली तरी धर्मशास्त्राला तिचा मंदिर प्रवेश नकोय. घरघुती धार्मिक विधी करत असतानादेखील स्त्रिला दुय्यम स्थान. यजमानाच्या डाव्या बाजूला बसवले जाते. पुरुष उजवा स्त्री डावी. हा संकेत. नवऱ्यापेक्षा स्त्री जास्त शिकलेली, अधिक कमावती असली तरी तिला दुय्यम मानले जाते. यजमानाचे हस्ते पुरोहित पूजा करायला सांगतो, अन् पत्नीला यजमानाच्याच्या हाताला हात लावायला सांगतो. अर्थात तिचे पूजेचे कर्म नाकारले जाते. किती रे विटाळ स्त्रियांचा पुरोहितांच्या धर्माला! आणि धार्मिक विधितील स्त्रीचे हे अपमानास्पद दुय्यम स्थान रग्गड दक्षिणा देऊन पुरोहितांकडून विधी करुन पक्के केले जाते. स्त्रिशुद्रातिशुद्रांना गुलामीत ठेवणारी ब्राम्हणी धर्माच्या आडपडद्यातून रचलेली ही कुभांडं समजून घेतल्याशिवाय स्त्रिशुद्रातिशुद्रांना आत्मसन्मानाने जगण्याचा मार्ग सापडणार नाही. देवा-धर्माच्या आडून अवास्तव भिती दाखवून थोपवलेली कर्मकांड नाकारुन निर्भयपणे निर्मळ मनाने धर्माचे आचरण करणे हाच संतांचा उपदेश सन्मानाने जगण्याचा पर्याय आहे.

तेली समाजातील एका राजकीय नेत्याचा मंदिर प्रवेश नाकारुन धर्माच्या ठेकेदारांनी अपमान केला. तो एका व्यक्तीचा मानायचा की जातीव्यवस्थेत ती व्यक्ती नीच जातीची मानलेली असल्याने अपमान झाला, याचा विचार केला असता तो जातीचाच अपमान ठरतो. ती व्यक्ती उच्च जातीय असती तर मंदिरात प्रवेश नाकारला असता? ■ ■



# तृष्णात्याग म्हणजे धम्म...

धम्मपदात बुद्ध म्हणतात, 'आरोग्य सर्वात मोठे लाभ आहे, समाधान सर्वात मोठे धन आहे, विश्वास करणे सर्वात मोठा नातेसंबंधी (बंधू) आहे, निबान हे सर्वोत्तम परमसुख आहे, आरोग्यासारखा श्रेष्ठ लाभ नाही. संतोष या सारखे श्रेष्ठ धन नाही. येथे संतोष याचा अर्थ दीनपणा अथवा परिस्थितीला शरण जाणे असा नाही. असे समजणे हे बुद्धाच्या शिकवणी विरुद्ध आहे, 'निर्धन लोक धन्य आहेत' असे बुद्धाने कोठेही म्हटले नाही.

'पीडितांनी परिस्थिती परिवर्तनाचे प्रयास करू नये.' असे बुद्धांनी कोठे ही म्हटले नाही. याउलट बुद्ध म्हणतात, संपन्नतेचे स्वागत असो. प्राप्त परिस्थितीत उपेक्षित जिने जगण्यापेक्षा वीर्यपूर्वक म्हणजे (प्रयत्नपूर्वक) परिस्थिती परिवर्तनाचे प्रयास श्रेष्ठस्कर आहेत. याउलट बुद्ध म्हणतात की, संतोष हे श्रेष्ठतमथन आहे, उच्च तेव्हा याचा अर्थ माणसाने लोभाच्या आहारी जाऊ नये असा आहे. कारण लोभाला सीमा नाही. जसे भिक्खू रठ्ठपलाने म्हटले आहे, 'मी अनेक धनवान पाहिले, जे मूर्खतावस कधीही दान करीत नाहीत. ते अधिकाधिक संग्रह करतात. त्यांची धन तृष्णा कधी क्षमत नाही. एखाद्या राजाने सागरापर्यंत पृथ्वी पादाक्रांत केली तरीही सागरापलीकडे पृथ्वी पादाक्रांत करण्याची त्याची आकांक्षा असतेच, त्याची तृष्णा जिवंत असतेच. असे राजे, महाराजे आणि सामान्यजण येतात आणि जातात. त्यांची तृष्णा, अभावाची भावना कायमच राहते. ते देह त्याग करतात आणि तरीही या पृथ्वीवर जिवंत असेपर्यंत त्यांच्या कामेच्छाची तृप्ती कधीच होत नाही.' महानिर्वाण सुत्तात बुद्धांनी आनंदाला लोभ नियंत्रणाची महती कथन केली. बुद्ध म्हणाले की, 'आनंद, हे असे आहे की, लोकांची इच्छाच तृष्णेची जननी आहे. जेव्हा लोभाची इच्छा स्वामित्वाच्या इच्छित परिवर्तित होते आणि या स्वामित्वाची इच्छा आपणास मिळाले ते आपणाशीच राहावे या इच्छेत परिवर्तित होते, तेव्हा या इच्छेचे लोभात परिवर्तन होते. लोभ, अर्थात, अन्यथा संग्रहाच्या असंयत कामनेवर नजर ठेवणे आवश्यक आहे, नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.

या तृष्णेचा किंवा लोभाचा का अधिकार करावा? बुद्ध आनंदास म्हणाले, 'कारण यातून अनेक दुष्ट आणि वाईट गोष्टीचा उद्भव होतो. यातून हाणामारी, जखमी करणे, भांडण, तंटा, घातप्रतिघात, विरोध आणि संघर्ष उद्भवतात. यातून कलह, निंदा, मिथ्याकथन आदी प्रवृत्ती प्रसवतात.' वर्ग संघर्षाचे हे अप्रतिम आणि सत्य विश्लेषण आहे यात शंकाच नाही. म्हणूनच बुद्धांनी तृष्णा आणि लोभ यावर नियंत्रण ठेवण्याचा उपदेश केला आहे आणि यालाच तृष्णा त्याग म्हणजे धम्म होय असे बुद्ध म्हणतात. ■ ■

तथागताची सत्य गाथा



देविदास राऊत
(बौद्धाचार्य)
मो. 8668238330



# पाय मागे ओढणारी प्रवृत्ती समाजाला घातकच ...

**एकंदरीत आजचे सामाजिक चित्र पाहता समाज सुधारलेल्या अवस्थेत मार्गक्रमण करीत असल्याचे दिसून येत असले तरी, त्याचा बरावाईट परीणाम माणसांच्या जगण्यावर पडत असतो आधी याचा विचार करणे आवश्यक आहे. समाज म्हटले की, त्यात विविध जाती, धर्म आणि पंथाच्या लोक समुहाला समाज संबोधले जाते. त्यामुळे सामाजिक व्यवहारात माणसामाणसातील संवादाला अधिक महत्त्व असते, अशा संवादातून माणसांसोबत माणसांची मने जुळत असल्याने त्यात विश्वासार्हतेला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त असते, जे माणूसकीला शोभून दिसते.**

मात्र, जलदगतीने बदलणारा समाज आपल्या स्वार्थापोटी प्रसंगी माणूसकी गहाण ठेवत, कधी कधी माणूसकीलाच कलंकित करणारी कृती करतो आणि अख्ख्या मानवजातीला बदनाम करीत असतो. इतरांचे भले व्हावे त्या मागोमाग आपलेसुद्धा हित साधले जावे, ही मानसिकता स्वार्थाने बरबटलेल्या आजच्या वर्तमानात धुसर होत असल्याचे पावलोपावली दिसून येत आहे. आजकाल माणसाला इतरांच्या सुखात आनंद न होता त्याच्या मनात तिरस्काराची भावना निर्माण होते. त्याप्रसंगी त्याची देहबोली ही समजण्यासारखी असते, ज्यात त्याचे नाटकी हास्य त्याच्या मनातील द्वेष भावना प्रदर्शित करीत असल्याचे दिसून येत असते. माणसाला आपल्या अस्तित्वाची जाणीव आणि जगण्याचे वास्तव माहीत असतांनाही, माणूस नावाचा समाजशिल प्राणी स्वार्थाने इतका आंधळा का होतो, हा खरा प्रश्न आहे. कोण दिवस येतो कसा कोण जाणतो, असे वं.राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी आपल्या भजनात सांगितले आहे की, माणूस आज आहे तसा तो उद्या असेलच याची काहीच शाश्वती नसते. त्याचा येथील जीवीत प्रवास कधी संपुष्टात येईल हे कुणीच सांगू शकत नाही. असे असतांनाही माणूस आपल्या क्षणिक स्वार्थासाठी मानविय दृष्टीकोणातून विचार न करता तथा माणूस म्हणून इतरांना सहकार्याचा हात न देता त्याचे पाय मागे ओढण्याचे अमानवी कृत्य करीत असतो आणि येथेच समता, बंधुता व मानवतेच्या तत्वाला सुरूंग लावला जातो. समाजात वावरत असतांना अनेकदा वाटते की, विश्वास कुणावर ठेवायचा. जेथे सर्वच क्षेत्रावर अविश्वासाचे ढग घोंगावत असल्याची स्थिती बघायला मिळत आहे. जेथे माणसेच माणसांची शिकार करण्यासाठी टपलेले आहेत. नातेसंबंधातील प्रेमभाव व घट्टता सैल होत असून, त्यात केवळ वडिलोपार्जित शेती व धनसंपत्ती वरून वितुष्टता वाढीस लागली आहे, त्यातूनच अनेकदा विपरीत दुर्दैवी घटना घडत आहेत, कधी मित्रच मित्रांचा फडशा पाडतो तर व्यावसायिक देवाणघेवाणीमधून अथवा श्रेष्ठत्वाच्या भावनेतून एकमेकांना संपविण्याचा प्रयत्न होतो.

खरे म्हणजे पुर्वीच्या तुलनेत आजच्या वर्तमानात धार्मिक प्रवचने, कीर्तने, पारायणे, प्रबोधने ही कॉलन्यात, मोहल्ल्यात, गल्ली रस्त्यावर मोठ्या प्रमाणात संपन्न व्हायला लागलेत, ज्यातून माणसाला आंतरिक, मानसिक, समाधान आणि माणसामाणसातील बंधुता वाढणे अपेक्षित असतांना दिवसेंदिवस समाज आहे. त्यापेक्षा अधिक सामाजिक स्वास्थ्य बिघडण्याच्या दिशेने धावतो आहे. खऱ्या अर्थाने प्रत्येक माणसाने माणसांप्रति 'जिओ और जिने दो' अशा विचारधारेचा अवलंब करणे अपेक्षित आहे. मात्र, तसे होतांना दिसत नाही. जेथे तेथे स्वार्थ, अविश्वास, बनवेगिरी, भ्रष्टाचारी प्रवृत्ती समाजाला पोखरून टाकीत आहे. प्रत्येकाने प्रत्येकाला सहकार्याचा हात देण्याचे सोडून त्याचे पाय ओढण्यात धन्यता मानण्याचे धोरण ठरवले असेल तर, ती त्यांची प्रवृत्ती समाजाला घातक आणि विनाशाकडे नेणारी ठरणार आहे, त्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने आपल्यातील उणिवा दूर सारून आपल्यात समता आणि बंधुत्वाच्या जाणिवा निर्माण करण्याचा प्रयत्न करावा. सोबतच विश्वास हा माणसामाणसांतील कर्तव्याचा भाग बनण्याची गरज आहे, कारण अंतिमतः तोच खरा जीवनमार्ग आपणा सर्वांच्या जगण्याचा प्रवास आनंददायी व सुखमय करणारा असेल! ■ ■



रतन तायडे
94201 25761

“ प्रश्न विचारणे ही ज्ञानाच्या शोधाची पहिली पायरी आहे. ”



# उठेगा अनल हक का नारा

*फैज अहमद फैज यांनी लिहीलेली ‘हम देखेंगे’ ही कविता अनेक दृष्टींनी ऐतिहासिक आहे. विशेषतः त्यातील ‘अनल हक’ या संकल्पनेमागे विवेकवादाचा सत्ता आणि धर्ममुखंडांशी झालेल्या संघर्षाचा इतिहास आहे. ‘अनल हक’ ही संकल्पना मांडणाऱ्या आणि त्याचे समर्थन करणाऱ्या काहींना सत्तेकडून मृत्युंदंड देण्यात आला. तर अनेकांना प्राणांतीक यातना देऊन छळण्यात आले.*

फैज यांनी वापरलेल्या `अनल हक’ चा इतिहास 9 व्या शतकापासून सुरु होतो. `अनल हक’ ही संकल्पना धर्मद्रोही असल्याचा आरोप सत्तेच्या समर्थकांकडून तेंव्हापासून होत आहे. इस्लामने ईश्वराला सर्वश्रेष्ठ सर्जक मानले आहे. ईश्वर हे अंतिम सत्य असल्याची श्रद्धा इस्लामचा मुलाधार मानली जाते. अल्लाह समान सर्जनाची क्षमता आणि त्याच्यासारखे अंतिम सत्य जगात काहीच नाही, असे बहुतांश मुसलमान मानतात. अनेक सुफी पंथांनी `ईश्वरी सत्य आणि सामान्य सत्य’ या संकल्पनेची पुनर्व्याख्या केली आहे. दहाव्या शतकाच्या सुरुवातीस सुफी मन्सूर बीन हल्लाजने स्वतःच्या विचारांना `अनल हक’ संबोधले आणि मोठा वाद उभा राहिला. `अनल हक’ याचा अर्थ सन्मानित सत्य अथवा मी बोललो ते सत्य आहे, असा होता. त्याच्या टिकाकारांनी `अंतिम सत्य’ हे फक्त ईश्वरीवाणीतून प्रकटले आहे आणि हल्लाजने त्याच्या विचारांना ईश्वरी वाणीच्या समकक्ष ठरवल्याचा दावा केला. हल्लाजच्या राज्यावरील टिकेने त्रासलेल्या अमीरांनीही खलिफांकडे त्याच्या तक्रारी केल्या. मन्सूर बीन हल्लाज धर्मद्रोही असल्याची आवई उठवली. मन्सूरला न्यायालयात खेचण्यात आले. अखेर त्याला फाशीची शिक्षा झाली. न्यायशास्त्री आणि धर्मशास्त्रींशी घातलेला वादही त्याच्या अंगवळणी पडला. राज्याच्या अंमलबजावणीची दिशा सरंजामी असू नये म्हणून त्याने अनेक कविता लिहील्या होत्या. त्या कविता त्याला राजद्रोही ठरवण्यासाठी पुरेशा ठरल्या. म्हणूनच इतिहासकार सुलैमान नद्वी म्हणतात, `मन्सूर हा धर्माचा नव्हे तर राज्याचा गुन्हेगार होता. त्याला उलेमांच्या शाईने नव्हे तर राज्याच्या तलवारीने सत्तेच्या अहंकारासाठी बळी दिले.’

नद्वी काहीही म्हणोत, मन्सूरला धर्मद्रोही मानणाऱ्यांचा गट आजही तितकाच प्रबळ आहे. सत्तेच्याविरोधात भूमिका मांडण्याची किंमत मन्सूर बीन हल्लाजने प्राण देऊन चुकवली आणि त्याच्या भूमिकांना ती आजही चुकवावी लागतेय. त्यातून मन्सूर बीन हल्लाज उलेमांच्या एका गटात निषिध्द विचारांच्या कक्षेत राहिला. तर दुसरा गट ज्यामध्ये शेख अबु बकर शिबली, दाता गंज बक्ष, शेख फरिदुद्दीन अतार, इमाम गजाली, जलालुद्दीन रुमी यांचा समावेश होतो, त्याला इस्लामी तत्वज्ञानाचा सच्चा अन्वयर्थक ठरवतोय. सरमद हा आत्मविकासाच्या संकल्पनेवर आधारीत सुफी साधनेची मांडणी करत होता. त्याने सत्याच्या शोधासाठी अनेक प्रयत्न केले होते. शरीरावरील वस्त्रांचाही त्याग केला होता. काही काळ साध्या लंगोटशिवाय तो कसलेच वस्त्र घालत नसे. ज्यावेळी तो दिल्लीला आला त्यावेळी दारा शुकोह त्याच्या भेटीसाठी गेला. या नंग्या फकिराच्या मागे दारासारखा राजपुत्र फिरायचा. दिल्लीचे राजकारण बदलले आणि `अनल हक’ ची पाठराखण करणारा हा सुफी सरमद आणि दारा दोघांनाही औरंगजेबाने मृत्युदंड दिला. या सरमदविषयी भारतात अनेक वाद आहेत. मुसलमानांमध्ये सरमदला यहुदी, काफीर म्हणणारा एक गट आजही त्याची निंदा करण्यात धन्यता मानतो. दुसऱ्या गटाकडून त्याला `सरमद शहीद’ म्हणून संबोधले जाते. `अनल हक’ विषयी काही चर्चा मध्ययुगीन काळात औरंगजेबाच्यानंतरही झाली. शाह वलीउल्लाह यांच्या काळातही या चर्चेला तोंड फुटले. पण राजकारणाच्या दिशा बदलल्या होत्या. सत्ता `अनल हक’ची दखल घेण्याइतकी संवेदशनशील नव्हती. त्यामुळे वाद टळला, असे म्हणता येईल. भारतात सातत्याने मन्सूरच्या विचारांची चर्चा ही मोठे आव्हान ठरली. विसाव्या शतकाच्या सुरुवातीला `अनल हक’ आणि मन्सुरने पुन्हा उर्दू साहित्याच्या मुख्य प्रवाहाला व्यापून टाकले. यावेळी कारण ठरले, उर्दूचे महाकवी इकबाल. भारतात इस्लामी ज्ञानविश्वातील `अनल हक’ची कोंडी फोडण्याचा त्यांनी प्रयत्न केला. 20 व्या शतकात डॉ. इकबाल यांनी मन्सूर बीन हल्लाजचे समर्थन केले.

इकबाल यांनी त्यांच्या जावेदनामा या महाकाव्यात `अनलहक’ च्या संकल्पनेवर कविता लिहीली. तेंव्हाही मोठे वादळ उठले. पण इकबाल त्या वादाला पुरुन उरले. इकबाल यांच्या काव्यनाटकातील `जिंदारुद’ हा संवादक महान इतिहासपुरुषांच्या आत्म्यांना भेटण्यासाठी स्वर्गाकडे निघाला आहे. तो स्वर्गात पोहोचल्यानंतर त्याची हल्लाजशी गालीब आणि कुर्रतुलऐन ताहीरा या महान कलाकारांच्या आत्म्यासमवेत भेट होते. ईश्वराने या तिघांच्या आत्म्यांना स्वर्गात स्थान दिले आहे, पण हे तिघे सत्याच्या




शोधात स्वर्गाबाहेर पडले आहेत. सत्याच्या शोधासाठी नरकयातना भोगायची त्यांची तयारी आहे, अशी त्या कवितेची मध्यवर्ती कल्पना आहे. मन्सूरच्या आत्म्याला भेटल्यानंतर जिंदारुद त्याला काही प्रश्न विचारतो. त्यापैकी हल्लाजला त्याच्या भुमिकेचे समर्थन करुन जिंदारुद म्हणतो, `अदूरदर्शी व्यक्तींनी उपद्रव माजवून ईश्वराच्या सच्च्या सेवकाला फासावर चढवले. तुझ्यावर अस्तित्वाचे रहस्य प्रकटले होते. मग सांग तुझा गुन्हा काय होता?’ त्यावर मन्सुर बीन हल्लाज म्हणतो, `स्वतःच्या सर्जनशक्तीवर विश्वास नसलेल्या मुडद्यांसारख्या जगणाऱ्या माणसांना मी माणसाच्या क्षमतांचा परिचय करुन दिला.

आत्मविकासाला नकार देणाऱ्या या पाखंडी लोकांना ते सहन झाले नाही.’ इकबाल यांच्या मन्सूरवरील या कवितांनी त्यांच्याविषयीच्या भारतातील चर्चेला एक नवे वळण दिले. मन्सुरचे समर्थन केल्याने इकबाल यांच्यावर टिका झाली. पण इकबाल यांचे टिकाकार काही राज्याच्या सत्तेतील अमीर, उमराव नव्हते. त्यामुळेच कदाचित त्यांना तितका त्रास झाला नाही. पण इकबाल यांच्याविरोधातला राग मात्र सातत्याने प्रकट होत राहिला. इकबाल यांच्यानतंर फैज यांनी `अनल हक’ चे महत्व सिद्ध करुन दाखवले. जानेवारी 1979 मध्ये फैज अहमद फैज यांनी `मेरे दिल मेरे मुसाफीर’ या पुस्तकात `अनल हक’ ही संकल्पना वापरुन `व यबका व जहू रब्बूका’ ही अजरामर कविता लिहीली. ज्यावेळेस ही कविता प्रकाशित झाली, तेंव्हा जनरल जिया उल हक यांनी पाकिस्तानात मार्शल लॉ ची घोषणा केली होती. तीन महिन्यांनी झुल्फीकार अली भुट्टोंना फाशी दिली जाणार होती. या पार्श्वभूमीवर फैज यांनी या कवितेतून जियाउल हक यांच्या सत्तेवर टिका केली. जालीम सत्तेच्याविरोधात गरीबांच्या समर्थनात सत्य पुन्हा उभारी घेईल, `उठेगा अनल हक का नारा’ असे त्यांनी म्हटले. त्यातील `अनल हक’ मी देखील आहे आणि तुम्ही देखील आहात, या विधानावर धार्मिक विद्वानांकडून आक्षेप घेतला गेला. पण फैज यांच्या शायरीच्या विरोधात ते उभे राहिले नाहीत. कारण उलेमांच्या एका गटाने त्याचा योग्य अन्वयार्थ लावून फैज यांची बाजू घेतली. आयुष्यभर फैज यांना विरोध करणारे अनेक उलेमा फैज यांच्या बाजूने उभे राहिले. पण जिया उल हक यांनी त्या पुर्ण कवितेवर बंदी घातली. फैजवर राजद्रोहाचा ठपका ठेवण्यात आला. इकबाल बानो यांनी 1985 मध्ये ही बंदी धुडकावली. त्यांनी लाहोर येथे फैज यांच्या जन्मदिनी ही कविता गाणार असल्याची घोषणा केली. तब्बल 50 हजार लोक ही कविता ऐकण्यासाठी जमा झाले. त्याकाळी पाकिस्तानात महिलांना सलवार कुर्ता घालण्याची ताकीद केली जात होती. पण इकबाल बानो काळी साडी घालून आल्या होत्या. इकबाल बानो कविता गात होत्या, त्यावेळी अल हिमरा ऑडीटोरीयममधल्या लोकांनी मोठ्या आवेषात `अनल हक’ चे नारे दिले. या विद्रोहातून `अनल हक’ म्हणजे सत्य प्रकटत होते. फैज यांनी कुरआनच्या `सुरह रहमान’ या अध्यायावर ही कविता लिहीली होती. गरीबांचे राज्यातील स्थान, राज्याची संकल्पना, इस्लामी प्रतिकांच्या चर्चेतून लोकशाही राज्याचे समर्थन हे फैज यांच्या कवितेचे वैशिष्ठ्य होते. जालीम सत्ता संपुष्टात येईल. अंतिम सत्य पुन्हा प्रकट होईल. असे फैज यांनी म्हटले होते. मन्सूर बीन हल्लाजने मांडलेली `सन्मानित सत्याची’ अथवा `गवसलेल्या सत्याची’ ही संकल्पना सत्याला सन्मानीत करताना मरणयातना भोगतेय हे मात्र निश्चित आहे. अहंकाराने माखलेली सत्ता `अनल हक’ च्याविरोधात उभी राहते हा इतिहास आहे. नागरीकत्व दुरुस्ती कायद्याचे शिर्षगीत म्हणून `अनल हक’ ने स्थान मिळवल्यानंतर त्याचा पुन्हा प्रत्यय आला. भाजप आणि त्याच्या समर्थकांनी फैज यांच्या कवितेविरोधात मोठा आकांड-तांडव केला. या कवितेवर आक्षेप घेतला. पण `अनल हक’ थांबली नाही. सत्याला सन्मानीत करण्याची त्याची आस अद्याप अबाधीत आहे. अखेरीस फैज यांच्याप्रमाणे आपणही एकेदिवशी असत्याचे तख्त कोसळून पडेल आणि सत्य सन्मानित होईल, ही अपेक्षा करुयात.

*‘‘सब ताज उछाले जाएँगे, सब तख़्त गिराए जाएँगे*
*बस नाम रहेगा अल्लाह का, जो ग़ायब भी है हाज़िर भी*
*जो मंज़र भी है नाज़िर भी, उट्ठेगा अनल-हक़ का नारा*
*जो मैं भी हूँ और तुम भी हो, और राज करेगी ख़ल्क़-ए-ख़ुदा*
*जो मैं भी हूँ और तुम भी हो’’* ■ ■

|| सरफराज अहमद ||

## समजुत

अनंतायन



ॲड. अनंत खेळकर
मो. 9370061677

त्याने दरवाज्यावर फलक लावला ‘मी दुःखी आहे. मला भेटून डिस्टर्ब करू नये.’ त्याचा खरा मित्र दरवाजा उघडून आत गेला अन् म्हणाला, ‘आपल्याला तर बुआ वाचताच येत नाही. अरे वेड्या! या दुनियेत माणूस ज्याला द्यायचा त्यालाच वेळ देतो. ते तर फक्त बहाणे असतात की मला वेळच मिळत नाही. खरे मित्र वेळात वेळ काढून येतात. तू विचार कर त्या व्यक्तीची समजूत काढणे किती कठीण असते, जी रूसली किंवा रागावली नाही पण बोलतही नाही. तुझी अवस्था अशी का व्हावी? की मनात खूप काही साचलेय अन् तू व्यक्त करू शकत नाही? माणसाने आपल्या भावनांना वेळेवर वाट मोकळी करून द्यायला हवी. मन आणि तलाव हे सारखेच असतात.

मनातील भावना अन् तलावातील पाणी प्रवाहीत झाले नाही, त्याचा योग्य निचरा झाला नाही तर साचलेले पाणी असो की भावना यांचे डबके तयार होते. जेथे डबके तयार होते त्याची अवस्था काय असेल हे तुला माहित आहे. हृदय जर वेळेवर मोकळे केले नाही तर हृदयविकार होऊ शकतो, एका हार्ट हॉस्पीटलच्या आय. सी. यू च्या दरवाज्यावर एक सुंदर शेर मी वाचला. तो तुलासुद्धा सांगतो, ‘दिल खोल के यदि, हंस बोल लेते अपने यारों के साथ, तो हमें यूँ ना खोलना पडता, औजारों के साथ।’ ■ ■

बहुजन सौरभ

# खरच ईश्वर आणि धर्माची कमालच आहे बुवा !




खरच ईश्वर आणि धर्माची कमालच आहे बुवा! विज्ञान, शिक्षण आणि ज्ञानाला लिलिया लोळवते! चांगल्या चांगल्यांना भ्रष्टाने गंडविते! साऱ्या जगाला युद्धाच्या यज्ञात ढकलून वरून वाहवा वाहवाही मिळविते. ‘शिकून शेण खाणे’ हा तर शिस्ताच झाला आहे. लोकांनांही हेच भावते. खरच या शेकोटीची ऊब कितीही शेकून घेतली तरी पुन्हा पुनः शेकून घ्यावशी वाटते. अशी ही कमाल जिथे घडते त्याला जेरुसलेम व काशी म्हणतात बरे! यात नव्याने शेंदरी, केसरी व भगव्या रेशीमबागची वर्णी लागली आहे बरे! अगदी शिस्तीत. शेवटी शास्तीच कामच ते!

खरेच सत्तेचा मार्ग, नसलेल्या ईश्वराचा नामजप करीत नासलेल्या धर्माच्या अग्नीपथावरून सहज पार करता येतो; हे ज्यांना गवसले ते सत्तेत जमतात व युद्धात, दंगलीत व तोडफोडीत रंगतात व रमतात. कारण हे कथानक लोकांचे बुद्धीचे कवाड बंद करुन नायक, नायिका, खलनायक व कॉमेडियन इत्यादिंच्या माध्यमातून धर्मनिर्देशक ‘तू चीज बडी है मस्त मस्त...’ म्हणत रंगवित त्यांच्या मनावर खोलवर शिर्की ताबा मिळवितात. मग लोकांना ‘बैठ जा! म्हटल की बहुतांश लोक बैठ गया..’ म्हणत भक्तीत रंगतात व युक्ती त्यागतात. ‘मार सालेको..’ म्हणताच शिर्की मारतात. यात मग To be or not to be एकच वाटते. 17 व्या शतकात तेव्हाचा नायक गोंधळला होता (Not to be..) कारण खलनायिक त्याची स्वतःची जन्मदात्रीच(To be..) होती. आता मात्र पात्रे बदलली आहेत. आता नायिका जन्मदात्री शिकून सवरूनही गोंधळलेली आहे (Not to be...) आणि खलनायक असलेला पुत्र मात्र (To be...) सुस्थीर आहे. ही आहे ईश्वरी नामजपाची धर्मांधी किमया. विज्ञान, तंत्रज्ञान, ज्ञान व शिक्षण ही यांची माध्यमे (Media) आहेत. म्हणून चिडलेले मानवेतर प्राणी हे या ईश्वराच्या नामजपात धर्माचा उबदार बुरखा ओढून सत्तेला नाचविणाऱ्या ठाकुरला ‘हे हात मुझे दे दो ठाकूर..’ म्हणत आव्हान देत सुटलेले आहेत. कारण त्यांचा बळी घेणारा असली ठाकूर या मानवेतर प्राण्यांनी जरी ओळखला तरी त्यांच्याकडे ‘हाताचा अभाव’ असल्यामुळे त्यांना साधे हातवरे व हातवर करणेही जमत नाही. ही दोन्ही कामे मानवालाच साध्य आहेत. त्यातल्यात्यात बागेश्वरी धर्म मार्तंडांचा तर यात प्रचंड हातखंडा व अखंड मुखधंदा आहे. यात नव्याने सिंदुरी सळसळही दाखल झाली आहे व त्याची वकीली करण्यासाठी विरोधकांनाही त्यांची कमकुवत नस दाबून जगभर भ्रमंतीसाठी बळजबरी ढकलून पाठविण्यात आले आहे. जो गेला नाही त्याचा खड्डा खोदून तयारीत ED व EVM बसलेली आहे. आता जगातील मध्यभागात युद्ध पेटलेले आहे. जेरूसलेम हे विविध धर्मांचे उगमस्थळ हे अग्नीकुंडी यज्ञ झालेले आहेत. यज्ञाच्या स्पर्धेत मागे पडू नये म्हणून गंगासिंग काशीभाऊ वाराणसीवाले त्यांच्या धमण्यात केसरी, भगवा, सेंदुररंगी रक्त सळसळत असल्याचे सांगत त्यांनी पंचामृत पेऊन नरकेसरी घोषणा केलेली आहे.



विनोद उलीपवार
मो.9370138078

इकडे नर्मदा किनारे वसलेली त्यांची Not to be.. असलेली परंतु कसलेली जिव्हाग्नी ‘तेरी उडती अटारी, मैने पंख लिए कटवाऐ...’ न म्हणता व रूदन न करता शांत राखडीत उब साठवून गोठून वसली आहे. त्यामुळे हिमनगाचे फिलिंग येते म्हणे! असे फिलिंग सर्वत्र जगभर आहे. कारण युद्धाच्या केसरी, भगव्या व शेंदुरी झळ कितीही पोळत सुटल्यातरी आपली वृक्षवल्ली ही स्वतःच्या अस्तित्वासाठी हिरवळ निर्मितीच्या कामी लागून अगोदरच मृगझोत फेकत पावसाळी फवारणी करीत लागलेल्या भगव्या, केसरी व शेंदुरी आगी विझविण्यासाठी गतीने सरसावली आहे. कुणीतरी तिला ‘हिरवी बया’ म्हणून डिवचल्यामुळे ती जास्तच ‘हिरवा चुडा’ परिधान करून खणखणत काँची गोंधळ घालत अरबी किनाऱ्या लगत दाखल झालेली आहे.

यामुळे अंधेरीतील भ्रामक विकासाचे धाबे दणाणून ते जलमग्न झालेले आहेत. पुन्हा ‘जोराचा धक्का हळूच’ अनुमानपूर्व मृगनक्षत्री वृक्षवल्ली हिरवळीने जर दिला तर, ‘अंधेरी नगरी, चौपट राजा’ अशी स्थिती निर्माण होऊन सह्याद्री तटाचे काही खरे राहणार नाही. मग सह्याद्रीच्या घसरणीला रोखण्यासाठी हिमालयाला नीतीद्वारे पाठविण्यात येईल. आलेली नीती मग गती घेते कि गती करते? हे घसरलेली अंधेरीच कळवेल. ‘करा गेले काय? झाले उलटे पाय’ असे कबूल न करणारे मात्र यानंतरही ‘आपदा में अवसर’ धुंडाळत याचाही राजकीय फायदा उपटुनच शांत होतील व पुन्हा म्हणतील ‘शांती तू नहीं जानती राजनिती’ असे म्हणून पुढील भगव्या रंगाच्या केसरी, शेंदुरी उधळण करतील. यासाठी रक्तदाना ऐवजी ‘शेंदुरदान’ शिबीरे आयोजित होतील.

या शिबिरात दान झालेले शेंदुरी रक्त जो कुणी आपल्या रक्तगटानुसार फुकट/ विकत घेईल त्याला शेंदुरी बाधा होऊन तो सुद्धा ‘बुरे दिनाला अच्छे दिन’ म्हणून प्रमाणित करुन आपले प्राण जपेल व म्हणेल ‘वचन जाऐ पर प्राण न जाऐ!’ मग हा न गेलेला प्राण ईव्हीएमने वापरून आपली भक्ती जगजाहीर करेल आणि ओरडू ओरडू सांगेल ‘जबतक शेंदूर है तबतक मुमकिन है।’ आता बोंबला, अजून काय? ■ ■

# मानसिक गुलामगिरी

**ज्या व्यक्तींचा जन्म 1950 ते 1970 च्या दरम्यान झाला ते फार भाग्यवान आहेत. त्या व्यक्तींची घरची परिस्थिती अत्यंत गरीबीची होती. खायला धड अन्न मिळत नव्हते, ना धड अंगावर कपडे. अशा या दारिद्र्यातून देखील आई-वडिलांनी या मुलांना शिक्षण दिले. नंतर ही मुले शाळेत गेली, खूप मेहनत घेतली, काबाड कष्ट करून प्रसंगी उपाशीपोटी राहून या मुलांनी शिक्षण घेतले. पदवी व पदव्युत्तर शिक्षण झाल्यामुळे नोकरीला सुद्धा लागले. पण कदाचित नोकरी कोणामुळे लागली हे काही लोकांना माहीत नसेल.**

आपल्या सर्वांना नोकरी लागली त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे आपला समाज म्हणजे शेड्युल कास्ट वर्ग. या समाजामुळे ही नोकरी आपल्याला लाभली. जर उच्च वर्गातील व्यक्ती असती किंवा ओबीसीमध्ये जरी असती तरी नोकरी मिळणे दुरापास्त झाले असते. दुसरे कारण असे की डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी गोलमेज परिषदेत आपल्या अस्पृश्यांची बाजू जोरदार मांडली. त्याचीच परिणीती म्हणून त्यावेळी इंग्लंडचे प्रधानमंत्री मॅकडोनाल्ड यांनी 17 ऑगस्ट 1932 ला ‘जातीय निवाडा’ मंजूर केला. हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा व आपल्या अस्पृश्य समाजाचा फार मोठा विजय होता.

1932 पासून आपल्या समाजाची हळूहळू प्रगती, विकास, उन्नती होत गेली. भारताला स्वातंत्र्य मिळाले. संविधान सभेवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मोठ्या कष्टाने, मेहनतीने निवडून आले. काँग्रेसने डॉ. बाबासाहेब आंबेडकर संविधान सभेवर येऊ नये म्हणून अनेक प्रकारच्या क्लुप्त्या लढविल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मसुदा समितीचे अध्यक्ष बनले. त्यांनी एससी, एसटी करिता काही खास तरतुदी करून ठेवल्या. तसेच ओबीसीकरता सुद्धा आयोग नेमून त्यानुसार त्यांनाही नोकरी मिळवी अशा प्रकारची तरतूद करून ठेवली होती. परंतु ओबीसी आयोग लागू होण्याकरता 1990 साल उजाडावे लागले. त्यासाठी मान्यवर साहेब कांशीराम यांना फार मोठा संघर्ष करावा लागला. हा इतिहास आपणास सर्वांनाच माहित आहे.



महादेव डांबरे
मो.9665047153

भारताचे संविधान 26 जानेवारी 1950 पासून लागू झाले. तेव्हापासून आपल्या समाजाची प्रगती सुरू झाली. त्या अगोदर आपण दोन हजार वर्षापासून वेगवेगळ्या देवी-देवतांची पूजा करीत होतो. त्यांना बकऱ्याचा, कोंबड्याचा नवस देत राहिलो. परंतु एकही देव-देवी आपल्याला प्रसन्न झाली नाही. या उलट आपल्याला गावकूसाबाहेर राहण्यास भाग पाडले. कोणीही आपल्याला शिवत नव्हते. तहान लागल्यावर आपल्याला कोणी पाणी पाजत नव्हते. एखाद्या दयाळू व्यक्तीने पाजले तरी ती व्यक्ती दोन फुटावरून पाणी टाकत होती व ओंजळ करून आपण पाणी पीत होतो व तहान भागवत होतो. आपली सामाजिक, आर्थिक, राजकीय व धार्मिक परिस्थिती फारच बिकट होती. आपल्याला देवानेही या गुलामीतून मुक्त केले नाही किंवा कोणत्याही उच्चवर्णीयंनी आपली मदत केली नाही. आपला एक तारणहार आपल्या मदतीला धावून आला, त्याचे नाव डॉ. बाबासाहेब आंबेडकर. आपण डॉ. बाबासाहेबांचे आजन्म ऋणी असायला पाहिजे. खरेतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच आपल्याकरता देव आहेत. ते देवापेक्षा कमी नक्कीच नाहीत. परंतु दुःखाची गोष्ट अशी की ज्या मंदिराने आपल्याला कोणतीच मदत केली नाही, तरीही आपल्या समाजाची काही लोक अजूनही मंदिरात चकरा मारतात. बोकड्याचा कोंबड्याचा नवस देतात. त्यांची मानसिक गुलामगिरी अजूनही गेली नाही. अर्थातच याला अपवाद आहेत, बरेच लोक आता फुले-शाहू-आंबेडकरी विचारधारा मानतात. जोपर्यंत आपला समाज या देव-देवीच्या मानसिक गुलामीतून बाहेर पडणार नाही तोपर्यंत आपल्या समाजाचा खऱ्या अर्थाने पूर्ण विकास होणार नाही. कारण असे की जर क्लास वन अधिकारी मंदिरात जात असेल तर त्याला समाजाचे अनेक लोक बघत असतात व नाईलाजाने ही मुलेसुद्धा त्या देवदेवीच्या मानसिक गुलामगिरीत नकळत अडकतात. ज्या डॉ.




बाबासाहेबांनी आपल्याला सुख समाधान पैसा गाडी माडी छोकरी नोकरी मिळून देण्यात खूप परिश्रम घेतले, प्रसंगी पत्रकारांची टीका सहन केली. उच्चवर्णीया कडून झालेला अपमान, त्रास, सहन केला. आपल्याकरता त्यांनी आपली चार मुले गमावली. याच उच्चवर्णीयांना आपण आज मदत करीत आहोत. मुला-मुलींच्या लग्नाला, वास्तुशांतीला, सत्यनारायणाला आपण भटजींना बोलविता. त्यांना दान देता, पैसा देता हे लोक आपल्याच पैशावर आपल्या मुलांना उच्चशिक्षित करतात व मोठमोठ्या पदावर रुजू होऊन आपल्या मुलाला बेरोजगार बनवितात. आपल्याच पैशावर ते श्रीमंत होतात. हे सर्व षडयंत्र ओळखून आपण यापासून दूर राहायला पाहिजे.

महात्मा फुलेंनी सामाजिक समतेचा लढा लढला. महात्मा फुलेंना भटाने किती त्रास दिला आहे, हे आपणास माहीत असूनही आपण या षडयंत्राचे बळी होता याचे या महापुरुषांना फार दुःख वाटत असेल. आरक्षणाचे जनक राजश्री शाहू महाराजांनी आपल्या बहुजन समाजाच्या मुलांना सक्तीचे व मोफत शिक्षण दिले. प्रशासनात भटा ब्राम्हणांनी 90 ते 95 टक्के जागा बळकावल्या होत्या. याचा सर्वे करून त्यांनी सर्वांना समान वाटा मिळावा म्हणून 26 जुलै 1902 ला आरक्षण लागू केले.

आपल्या या बहुजन महापुरुषांनी आपल्यासाठी अपार कष्ट घेतले. त्यांनी आपल्या जीवाची पर्वा केली नाही. या महापुरुषांच्या अथक परिश्रमामुळेच आज आपण खूप सुख समाधानाने जीवन जगत आहोत. याची आपण बहुजनांनी जाण ठेवली पाहिजे. यापुढे आपण कोणत्याही पुजाऱ्याला दक्षिणा देऊ नये. जे काही द्यायचे असेल ते समाजातील गरीब मुलांना द्या. एखादे मूल दत्तक घेऊन त्यांना शिक्षण द्या. ते जन्मभर तुमचे उपकार विसरणार नाहीत. काही लोक अशा प्रकारची मदत करीत आहेत ही एक आनंदाची गोष्ट आहे. तेव्हा आपण सुशिक्षित आहात काय, चांगले काय वाईट हे आपल्याला समजते, हे आम्हाला माहित आहे. एक वेळ आठवण करून द्यावी त्याकरता एवढा प्रपंच/खटाटोप. ■ ■

# नागराजा प्रसेनजीतचे शाक्य, हरयंक नागवंश संबंध

शाक्य लोक सूर्यवंशी ओक्काकु कुळाचे होते. त्यांची मान्यता शाक्य दर्शना अंतर्गत होती. हे अनुशासित गण संघीय परंपराचे वीर योद्धा होते. यांचे कुळ हिमालय तराईच्या साखुवा वृक्ष आणि साक्य (गरुड) पक्षाच्या नावावर अंकित आहे. अर्थात हे पूर्ववत समन संस्कृतीचे नागवंशी होते. यांच्या संस्कारात स्त्रियांचा सामान अधिकार व सम्मान सुरक्षित होता. शाक्य दर्शनाचे संस्थापक राजऋषी कपिल मुनि होते. त्यांच्याच नावावर कपिलवस्तु नगराची स्थापना झाली होती. श्रावस्ती नरेश भौरनाग नि कपिलवस्तुच्या सिंहहनु शाक्य ला स्वतंत्र राज्य अधिकार देऊन राजा घोषित केले होते. तेंव्हापासून शाक्य कुळ राजतुल्य सम्मानाची मान्यता घेऊन राज्य करीत होते. सिंहहनु शाक्याचे वडील जयसेनादित्य होते. कपिलवस्तुच्या शेजारी महारवाकोट, तिरोराकोट व मोरियकोट स्वतंत्र गणराज्य होते. सिंहहनु शाक्याचे लग्न महारवाकोटची राजकुमारी ‘कच्चायना’शी झाले होते. या वैवाहिक संबंधाला श्रावस्ती नरेश भौरनागाची सहमती होती. सिंहहनु शाक्य स्वतंत्र राजा घोषित होताच युद्ध पराक्रम करून आजूबाजूचे क्षेत्र काबीज करून उपजाऊ भूमी, अन्न, धान्य, पाळीव प्राणी, पशु, पक्षी, घोडे, बैल व नौकर सेवक आणि सैन्य बलानी शक्तिवर्धक लबालब संपत्तीचा वैभवशाली राजा सिद्ध झाला.

सिंहहनु व राणी कच्चायना चे 5 पुत्र 1) शुद्धोधन 2) ध्योतोधन 3) शाक्योतोधन 4) शुक्लोधन 5) अमितोधन व दोन मुली 1) अमिता 2) पमिता होती. ज्येष्ठ पुत्र शुद्धोधन राज्याचा उत्तराधिकारी होताच त्याने अनेक युद्ध पराक्रम करून धन अर्जित करून मोठ-मोठे राजमहल, पिकाऊ भूमी, स्वर्ण, चांदी, आभूषण, हिरे, माणिक, मोती अर्जित करून वैभव श्रीमंतीत खूब वृद्धी केली. शुद्धोधनाचे लग्न देवदह नरेश कोलीय नागराजा अंजन व राणी सुलक्षणा ची कनिष्ठ पुत्री देवी महामाया शी झाले. शुद्धोधन महामायाला 5 वर्षापर्यंत संतान प्राप्त न झाल्यामुळे पुन्हा त्यांनी नागराजा अंजनची ज्येष्ठ पुत्री महाप्रजापतीशी लग्न केले.

या वैवाहिक संबंधाला हि श्रावस्ती नरेश महाकौशल नागराजाची स्वीकृती होती आणि त्याचवर्षी देवी महामाया गर्भवती झाली आणि प्रसवाकरिता माहेरी देवदह जाण्या करीता सुरक्षा सेविका दल, बग्गी, अंगरक्षक घेऊन निघाली होती. मार्गात निंबोनी (लुम्बिनी) वनात शाल्व वृक्षांचा फुलांना बघून विसावा घेण्याच्या आनंदात प्रसव पीडा आरंभ झाली आणि त्याच वनात बाळ सिद्धार्थाचा जन्म झाला. तो दिवस वैशाखी पूर्णिमा ई.पू. 563 ठरला. देवी महामाया आजारी पडली आणि बाळ सिद्धार्थाला ज्येष्ठ बहीण महाप्रजापती गौतमीकडे सौपवून तत्वलीन झाली. कोलीय नागराजा दंडपाणिची राणी पमिता (राजा शुद्धोधनाची बहीण) ची पुत्री यशोधरा राजकुमार सिद्धार्थाची राणी होती. पुढे हाच राजकुमार सिद्धार्थ ‘बुद्ध’ झाला.

*ई.पू. 600 मधे महाकौशल राज्यावर भौरनाग राजाचे समृद्ध साम्राज्य होते. राज्याची राजधानी श्रावस्ती, जिथे सर्व काही अवस्थित आहे, अशी वस्ती (सरावस्ती) नगर वैभव श्रीमंतीने लबालब होते. दूर दूर पर्यंत विदेशी व्यापारिक रिश्ते संबंध पसरले होते. भौरनाग राजाचे कुल इतवाकु या ओक्काकु (इक्ष्वाकू) हे सूर्यवंशी गोत्र मानल्या गेले होते. (इत = सूर्य) यांच्या पूर्व पिढीचे रिश्ते संबंध कपिलवस्तुच्या शाक्य कुळाशी होते.*

इकडे महाकौशल नरेश भौरनाग - राणी मंगला, पुत्र कोसलनाग - राणी पसंन्ना देवीलाही पुत्ररत्न प्राप्त झाले होते. मातेच्या नावावरून पुत्राचे नाव पसेनदि नावनाग परंपरे अनुसार ठेवण्यात आले. तोच महाराजा प्रसेनजित म्हणून इतिहासात प्रसिद्ध झाला. कारण तो सिद्धार्थ बुद्धाच्या समकालीन समवयस्क सहवासी होता. बालपणापासून तो जंगलात जाऊन प्रसवित हत्तीनीच्या बाळ हत्तीसोबत आणि प्रशिक्षित गजबल सैन्यातील हत्तीच्या पिल्लांसोबत (अठखेलिया) खेळत असे. पसेनदिची काया हष्टपुष्ट गजा प्रमाणे होती, म्हणूनच त्याला मातंग राज म्हटल्या गेले. महा तन अंग = मातंग, हा शब्द जाती विषयक नसून गुण विषयक आहे. तक्षशिला महाविद्यालयात पसेनदि 64 कला व 18 विद्येत पारंगत झाला होता. त्याला गज दलाची भाषा कळत होती. त्याला बघून गज दल नाचत असे. वेळो प्रसंगी उत्सवात गज दलाचे नृत्य प्रदर्शन होत होते.




एकदा महाराजा प्रसेनजीत नि बुद्धाला आमंत्रित केले. तेंव्हा 500 भिक्षु सोबत प्रत्येकी एक गज सुंडात चंवर छत्र धरून त्यांच्या मागे सावली करत चालत होते. 500 पैकी 1 गज हिंसक, क्रूर व बिगडैल होता. तो भंते अहिंसक (अंगुलीमाल) कडे आला आणि नतमस्तक करून त्याने सुंडात चंवर छत्र पकडून त्यांच्यामागे सावली करत चालता झाला. तेंव्हा भंते अहिंसक अर्हत पावले, हे सर्वांना कळले. यावरून सिद्ध होते कि महाकौशल नरेश प्रसेनजीतच्या गज दल बलात 500 प्रशिक्षित हत्ती होते. हरयंक नागवंशी मगध नरेश नागराजा उदय भद्रीयला पसन्ना नावाची पुत्री होती. ती फुलासारखी सुंदर होती. पसन्नाचा भाऊ मगध नरेश बिंबिसार होता. मगध देशात महाश्रेष्ठी, ज्योतीय, जटिल, पुन्नक, काकबलीय व मेंढक मोठे व्यापारी होते. महाकौशल नरेश प्रसेनजीत नि मगध नरेश बिंबिसारला मोठ्या व्यापाऱ्यांची मागणी केली. बिंबिसार नि मेंढक पुत्र धनंजयला श्रावस्तीत पाठविले. तो साकेत (अयोध्या) नगरात स्थानिक झाला. त्याला विशाखा नावाची पुत्री होती. पुढे तीच ‘मिगारमाता विशाखा’ म्हणून प्रसिद्ध झाली. कोसलनरेश प्रसेनजीतच्या दरबारी बाबरी नावाचा महाआमात्य होता. महाराजा प्रसेनजीतचा राज्याभिषेक आमात्य बाबरीनेच केला होता. नंतरच्या काळात तो अर्हत झाला. त्याच्या नावानी साकेत (अयोध्या) इथे बाबरी महाविहार निर्मित झाले होते. पसन्ना पुत्र कोसल नरेश प्रसेनजीत होता. प्रसेनजीतला सुमन नावाची मोठी बहीण हि होती. प्रसेनजीत ला 7 राण्याचे वैभव प्राप्त होते, 1) मल्लिका 2) वासमखत्तीया 3) वस्सिका 4) सुमना 5) उव्वीरी 6) सोमा 7) सुकूला.

प्रसेनजीतचे लग्न मल्ल राजकुमारी मल्लिकाशी झाले होते. तिला एक पुत्री वरजीरा झाली होती. पुढे जेंव्हा बुद्धाला प्रसिद्धी प्राप्त झाली तेंव्हा त्याने पुत्ररत्न प्राप्तीकरीता कपिलवस्तूच्या शाक्यांकडे वैवाहिक संबंधाचा प्रस्ताव पाठविला. महाकौसल नरेश प्रसेनजीत त्या काळचा मोठा राजाधिराज होता. शाक्यांनी मन दाबून प्रस्ताव स्वीकार केला. जेंव्हा प्रसेनजीत वरात घेऊन कपिलवस्तूला पोहचले तेंव्हा शाक्यांनी महानाम शाक्याची राणी दासी नागमुंडाची तरुण पुत्री वासमखत्तीयाशी प्रसेनजीतचा लग्न समारंभ पार पाडला. प्रसेनजीतला या रिश्त्यावर काहीच आपत्ती नव्हती, कारण ती शाक्य कन्याच होती. तिला एक भाऊ ‘नंद’ महानाम शाक्याचा पुत्र होता. प्रसेनजीत वासमखत्तीयाला घेऊन श्रावस्ती राजनगराला आले. तिच्याकडून प्रसेनजीतला पुत्ररत्न प्राप्त झाले. त्याचे नाव ‘विडुदभ’ होते. ई.पू. 600 च्या दरम्यान महाकौसल राज्य सर्व शक्तिमान व समृद्ध आणि सैन्य बळाने विश्व विख्यात होते. प्रजा हि सैनिक प्रवृत्तीची होती. म्हणूनच कोसल राजांनी आपल्या पुत्राचे नाव प्रसेनजीत ठेवले होते. महाकौसल नरेश भौरनाग राजाचे तक्षशिला नरेश पुक्कुसतीशी मैत्री संबंध होते. या संबंधापासून मगध नरेश बिंबिसारची शक्ती समृद्धीत वृद्धी होत गेली. कोसल नरेश प्रसेनजीतची बहीण कोसल्यादेवी मगध नरेश बिंबिसारची राणी होती.

मगध नरेश बिंबिसारनि तीन व्यापारी महाकौसल देशात पाठविले होते. दोन्ही राज्याची मैत्री स्थापनामुळे प्रजा सुख, शांती व सुरक्षा नि उन्नती करत खूब विकसित झाली होती. याच काळात ई.पू. 340 च्या दरम्यान कपिलवस्तूचे राजकुमार सिद्धार्थ दुःख निवारणाचा मार्ग शोधत मगध देशाच्या समीप पोहचले होते. मगध नरेश बिंबिसार नि खूप विनंती केली, सिद्धार्थ तुझे वडील माझे मित्र आहेत, तुला जी मदद पाहिजे ती मी पूर्ण करू शकतो. माझे सैन्य बळ घेऊन जा, तुझ्या वैऱ्यांना युद्धात परास्त करून आपले राज्य प्राप्त कर. या तरुण वयात पत्नी, पुत्राला सोडून वृद्ध माता, पितांना सोडून इकडे या घनदाट जंगलात का वावरतो? हे वय आनंद भोगायचे असते. सिद्धार्थ म्हणाला, मला कोणीच प्रवृत्त केले नाही, कोणीच माझा वैरी नाही, मला दुःख मुक्तीचा मार्ग शोधायचा आहे. हे एकूण बिंबिसार निवेदन करून परतला. जेंव्हा सिद्धार्थाला बुद्धत्व प्राप्त झाले, हे एकूण कोसल नरेश महाराजा प्रसेनजीत नि श्रावस्तीचे आमंत्रण ‘बुद्धा’कडे पाठविले. निमंत्रण स्वीकार होताच बुद्धाला एक सुंदर पुष्प आच्छादित वन दान करायची श्रद्धा उत्पन्न झाली. त्याच प्रयत्नांतर्गत त्यांचा अमात्य (खजांची) ‘सुदत्त’ अनाथपिंडक (अनाथाचे दानदाता) शोध करीत एका उद्यानावर केंद्रित झाला. त्या उद्यानाचे मालक जेतकुमार होते. तो उद्यान विकायला तयार नव्हता. त्या उद्यानाच्या सर्व क्षेत्रावर स्वर्ण मुद्रा (कार्षापण) आच्छादित करून विक्रीची किंमत तय झाली आणि अनाथपिंडक स्वर्ण कार्षापण पसरवू लागला.

जेत कुमार नि विचारले हे उद्यान तुम्ही कशा करीता घेऊ इच्छिता? तेंव्हा अनाथपिंडक म्हणाले, आपल्या श्रावस्ती नगरात तथागत बुद्धाचे आगमन होत आहे, त्यांना हे उद्यान महाराजा प्रसेनजीत दान देऊ इच्छित आहेत. हे एकूण जेतकुमार द्रवित झाला, म्हणाला अर्धी किंमत कमी करतो. ते माझ्याकडून दान समजावे. परंतु उद्यानाला माझ्या नावाची फलक पट्टी असावी. तेंव्हापासून त्या उद्यानाचे नाव ‘जेतवन’ पडले. पुढे तिथे मोठे विहार निर्मित झाले. बुद्धाचे सर्वाधिक 25 वर्षावास इथेच संपन्न झाले, तिथेच 74 थेर व 24 थेरी बुद्धाच्या संघात होते. हि दान भावना महाकौसल नरेश प्रसेनजीत व अमात्य अनाथपिंडक (अनाथांना दान करणारे) ची इतिहासात स्वर्णीम अक्षरी नोंद आहे. त्या दोघांनी बुद्धाची धम्म दीक्षा स्वीकार केली. एकदा प्रसेनजीत आपल्या सैन्य दलबला सहित दक्षिणेकडे जंगलात डाकू अंगुलीमालचा वध करण्याकरीता निघाला होता. जाते वेळी जेतवनात येऊन बुद्धाचे दर्शन करीत होता. प्रसेनजीतची मुख मुद्रा लाल, तमतमीत, मनात उग्रता झलकत होती. बुद्धाने कारण विचारले. प्रसेनजीत उद्गारले, माझ्या राज्यात प्रजा असुरक्षित व भयभीत आहे. दक्षिण च्या जंगलात डाकू अंगुलीमाल नि धुमाकुळ पेटवला आहे. आज मी त्याचा वध केल्याशिवाय वापस येणार नाही. बुद्धानी भिक्षु संघा कडे तर्जनी इशारा केला आणि एक भिक्षु त्यांच्या समक्ष उपस्थित झाला. बुद्ध म्हणाले हाच तो अंगुलीमाल. महाराजा प्रसेनजीत एकाएक घाबरत मागे सरकला, म्हणाला अविश्वसनीय, अकल्पनीय, हे संभव नाही. शेवटी तो भिक्षु उद्गारला, मीच आहे अंगुलीमाल, अहिंसक (सुखदीप) पिता गार्ग्य व माता मित्रायणी, गोत्र भग्गव, हे एकूण प्रसेनजीतला विश्वास झाला कि हा खरोखरच अंगुलीमाल आहे. कारण ते त्याच्या आई वडलांना व त्यांच्या गोत्राला ओळखत होते. महाराजा प्रसेनजीत उद्गारला, तथागता हे तुम्ही कसे साध्य केले? तुम्ही खरोखरच मानव रूपात भगवान (देव) आहात. ■ ■



धम्मपाल देशभ्रतार
मो. 9131422581

# प्रतिबंधित एचटीबीटी बियाण्यांच्या विक्रीत शेतकऱ्यांचा वापर



**यवतमाळ :** बोगस बियाण्यांमुळे होणारी फसवणूक, उत्पादनावर झालेला परिणाम, शेतीचा वाढलेला खर्च आदी कारणामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत आला आहे. अशा शेतकऱ्यांना गळाला लावून अनेक बियाणे कंपन्या व दलाल त्यांचा वापर आता बोगस बियाणे विक्रीच्या साखळीत करत असल्याचा धक्कादायक प्रकार जिल्ह्यात उघडकीस आला आहे. जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर लागवड होणाऱ्या कापसासाठी प्रतिबंधित एचटीबीटी (तणनाशक सहनशील) बियाण्यांची विक्री शेतकऱ्यांच्या माध्यमातून होत असल्याचे वास्तव कृषी विभागाच्या कारवाईतून समोर आले आहे. राळेगाव आणि नेर तालुक्यात या घटना उजेडात आल्या. राळेगाव तालुक्यातील अंतरगाव येथे एका शेतकऱ्याच्या घरात तर नेर तालुक्यातील माणिकवाडा येथे एका शेतकऱ्याच्या शेतात कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी धाड टाकून लाखो रुपयांचे बोगस बियाण्यांचा साठा जप्त केला आहे. जिल्ह्यात कापसाचे क्षेत्र वाढल्याने, हे संधी साधून काही कृषी केंद्र चालक आणि कंपन्यांचे एजंट संगनमताने शेतकऱ्यांच्या माथी बोगस आणि प्रतिबंधित एचटीबीटी बियाणे मारण्याचा घाट घालत असल्याची तक्रार आहे. ही प्रतिबंधित बियाण्यांची पाकिटे अनेकदा विश्वासातील शेतकऱ्यांच्या घरी, शेतात साठवली जातात आणि तेथूनच कंपनी एजंटामार्फत त्यांची थेट गावात विक्री केली जाते. कंपन्यांचे एजंट थेट शेतकऱ्यांशी संपर्क साधून, त्यांना तणनाशक सहनशीलतेचे आमिष दाखवून या बियाण्यांची विक्री करतात. हा गोरखधंदा जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात फोफावला असल्याची शेतकऱ्यांची तक्रार आहे. राळेगाव पंचायत समितीच्या कृषी अधिकारी मनीषा पाटील यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारावर, त्यांच्या पथकाने तालुक्यातील अंतरगाव येथील शेतकरी कैलास डोमाजी चंदनखेडे याच्या घरावर धाड टाकली. या कारवाईत चंदनखेडे याच्या घरातून 'आर कॉटन बीजी फोर', 'हायब्रीड सीड्स', 'आर कॉटन 702 फोरजी' अशा विविध कंपन्यांच्या एचटीबीटी कापूस वाणांची एकूण 48 पाकिटे जप्त केली. या बियाण्यांची किंमत सुमारे 43 हजार 248 रुपये असल्याचे सांगण्यात येत आहे. कैलास चंदनखेडे याच्या विरोधात बियाणे अधिनियमानुसार विनापरवाना प्रतिबंधित बियाण्यांची साठवणूक आणि विक्री करण्याचा प्रयत्नाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नेर तालुक्यातील माणिकवाडा येथे रोशन उर्फ राजू शेलोकर या शेतकऱ्याने शेतात अवैध बियाणे लपवून ठेवल्याची माहिती कृषी विभागाला मिळाली. त्या आधारे धाड टाकून शेतकऱ्याच्या शेतातून 'कॉट55' व 'राजाराम 7' नावाची बियाण्याची लपवून ठेवलेली 62 पाकिटे जप्त करण्यात आली. यात एचटीबीटी प्रकाराचे अनधिकृत व मान्यता नसलेले कापूस बियाणे असल्याचे निष्पन्न झाले. जप्त केलेल्या बियाण्याची एकूण किंमत 77 हजार 500 रुपये असून, यावेळी 55 हजार रुपये किमतीची मोटार सायकल मिळून एकूण एक लाख 32 हजार 500 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

# मद्यपी पोलीस उपनिरीक्षकाचा आरोग्य केंद्रात गोंधळ ...



**अकोला :** दारूच्या नशेत पोलीस उपनिरीक्षकाने दहिहांडा प्राथमिक आरोग्य केंद्रात गोंधळ घालून वैद्यकीय अधिकाऱ्यांना अश्लील भाषेत शिवीगाळ केली. पोलीस उपनिरीक्षक तेवढ्यावरच न थांबता त्यांनी वैद्यकीय अधिकाऱ्यांना गुन्हा दाखल करून निलंबित करण्याची धमकी सुद्धा दिली. या प्रकरणी वैद्यकीय अधिकाऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे धाव घेऊन लेखी तक्रार दाखल केली. डॉ. सागर कळसकर असे तक्रारकर्त्या डॉक्टरचे नाव असून पोलीस उपनिरीक्षक गडलिंगे यांच्यावर आरोप करण्यात आले आहेत. या घटनेची चित्रफित समाजमाध्यमातून प्रचंड प्रसारित झाली आहे. दहिहांडा प्राथमिक आरोग्य केंद्रात सन 2023 पासून वैद्यकीय अधिकारी पदावर डॉ. कसरकर कार्यरत आहेत. 25 मे रोजी प्राथमिक आरोग्य केंद्रात ते कर्तव्यावर असतांना सकाळी 11.30 वाजताच्या सुमारास दहिहांडा पोलीस ठाण्यातील पोलीस उपनिरीक्षक प्रभुदास गडलिंगे वर्दीमध्ये केंद्राच्या परिसरात येऊन गोंधळ घातला. त्यांच्या जवळ जाऊन विचारणा केली असता त्यांनी केंद्र बंद आहे का? असा प्रश्न केला. रविवार असल्याने ओपीडी बंद आहे. अत्यावश्यक सेवा सुरू असतात, असे सांगितले. त्यावर पोलीस उपनिरीक्षकांनी 'तू इकडे हजर राहत नसतो. मी तुझी तक्रार करतो व तुला निलंबित करतो, न्यायाधीश माझे नातेवाईक आहेत. गुन्हा दाखल करतो. मी वर्ग दोनचा अधिकारी आहे.' असे म्हणून प्रचंड शिवीगाळ केली. त्यानंतर ते दुचाकीने निघून गेले. ही संपूर्ण घटना भ्रमणध्वनीद्वारे चित्रित करण्यात आली आहे.




## दिपंकर महाबोधी विहार चंद्रनगर नागपूर

रोज सायंकाळी 6.30 वाजता बुद्ध वंदना होते. मुलांना सुद्धा असल्या तेव्हा मुले वंदना घेतात. मुलांचे कॅडर कॅम्प घेतले जातात. वंदना झाल्यावर बुद्ध आणि त्यांचा धम्म व अन्य ग्रंथाचे वाचन केले जाते. प्रासंगिक कार्यक्रम आयोजित केले जातात. अध्यक्ष सुनीता पाटील 8983345317, सचिव चंद्रकला सरदार.

संवाद मित्र, श्रीराम बनसोड
मो. 918208617748

# महत्वाचे

## बहुजन सौरभ वर्तमान पत्राचे उत्तर नागपुरच्या बुद्ध विहारांना वाटप



**नागपूर :** रमाई बिनाकी बुद्ध विहार, सुभेदार रामजी आंबेडकर बुद्ध विहार, शाक्य मुनि बुद्ध विहार, बाबा बुद्धाजी नगर, पंचशील बुद्ध विहार, सुजाता बुद्ध विहार येथे समाज सेवी अधिर बागडे यांनी बहुजन सौरभ पत्रिका अशोक रामटेके, अविनाश नारनवरे, संघरक्षित मेश्राम, गिरधर पाटील, दिलीप मेश्राम, यांना गणविर फुलझेले यांनी वाटप केले. ही पत्रिका सर्व बुद्ध विहारात गेली पाहीजे व सर्व बुद्ध उपासक, उपासिकानी याचे वाचन करावे.

## रमाबाई आंबेडकर यांना अभिवादन




**नांदेड :** नांदेड जिल्हा व शहर कॉंग्रेस कमिटी कार्यालयात खा. रविंद्र पाटील चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत माजी प्रधानमंत्री दिवंगत जवाहरलाल पंडित नेहरू आणि रमाबाई भीमराव आंबेडकर यांची पुण्यतिथी निमित्त कॉंग्रेस पक्षातर्फे अभिवादन करण्यात आले. या नांदेड जिल्हा व शहर कॉंग्रेसचे पदाधिकारी उपस्थित होते. त्यात दक्षिण नांदेड जिल्हा कॉंग्रेस अध्यक्ष हनमंतराव पाटील बेटमोगरेकर, श्याम दरक, रेखा चव्हाण, करुणा जमदाडे, सुरेंद्र घोडजकर, प्रफुल्ल सावंत, बालाजी चव्हाण, सुरेश हटकर, आनंद चव्हाण, एकनाथ मोरे, गंगाधर सोनकांबळे, मुन्तजीब, मुन्ना अब्बास, एजाज कुरेशी, सत्यपाल सावंत आदी पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित राहून अभिवादन केले.

## स्त्रीभूषण रमाई आंबेडकर संस्था द्वारा गरजू महिलांना साड्या वितरण



**नागपूर :** स्त्रीभूषण रमाई आंबेडकर यांच्या 90 व्या स्मृतिदिनानिमित्त गरजू महिलांना साड्या वितरण कार्यक्रम स्त्रीभूषण रमाई आंबेडकर संस्था नागपूरद्वारा संस्थेच्यावतीने वाटोळा परिसरातील सिंम्बायसिस कॉलेज जवळील गरीब गरजू महिलांना साड्या वितरणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. भदंत नाग दीपंकर महास्थविर मार्गदर्शक समता सैनिक दल यांच्या हस्ते गरीब व गरजू महिलांना साड्यांचे वितरण करण्यात आले. याप्रसंगी स्त्री-भूषण रमाई आंबेडकर संस्थेचे अध्यक्ष राजकुमार वंजारी, समता सैनिक दलाचे ज्येष्ठ अधिकारी नरहरी मोटघरे, समता सैनिक दलाचे अधिकारी चंद्रभान भोवते, सामाजिक कार्यकर्ते ज्ञानेश्वर शेंडे, वनमाला वंजारी, मानव वंजारी आदी उपस्थित होते.

## वॉटर हिरोंचे 'कॉफी विथ कलेक्टर योजना काय?




**अकोला :** 'जिल्हाधिकारी महोदयांसोबत कॉफी घ्यायची?, मग 500 जलतारे पूर्ण करा ना!' या प्रेरणादायी घोषणेनंतर वाशीम जिल्ह्यात जलतारा अभियानात उल्लेखनीय प्रगती झाली. त्या गावाच्या प्रतिनिधींसह जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस. यांनी 'कॉफी विथ कलेक्टर' हा विशेष कार्यक्रम घेतला. यावेळी उपक्रमात सहभागी गावकऱ्यांशी जिल्हाधिकाऱ्यांनी संवाद साधून उपक्रमाच्या कार्याची माहिती जाणून घेतली. वाशीम जिल्ह्यात जलसंधारण आणि भूजल पुनर्भरणासाठी जलतारा उपक्रम सुरू केला. एका शोषखड्डयाद्वारे 3.80 लाख लिटर पाणी मुरवता येते. त्यामुळे सिंचनाची उपलब्धता वाढून उत्पन्न दुप्पट होण्याची शक्यता आहे. मनरेगाच्या माध्यमातून 75 हजार 396 शोषखड्ड्यांचे काम सुरू असून, यासाठी 37.69 कोटी रुपये मंजूर झाले आहेत. या चळवळीत सामाजिक संस्थांचा सक्रिय सहभाग आहे.

# मोदी सरकारकडून 270 कोटींचा निधी रोखला?



**नागपूर :** शहरात विविध विकासकामे सुरू आहेत. ही कामे 15 व्या वित्त आयोगाअंतर्गत आहेत. केंद्र सरकारकडून 270 कोटींचा निधी मिळण्यास अडचणी निर्माण झाल्या आहेत. त्याचा परिणाम शहरात सुरू असलेल्या विकासकामांवर होत आहे. माजी महापौर दयाशंकर तिवारी यांनी या बैठकीत वित्त आयोगाअंतर्गतच्या अटी शिथिल करण्याची मागणी केली होती. वित्त आयोगातील जाचक अटींमुळे केंद्राकडून मंजूर झालेल्या प्रकल्पासाठी निधी मिळू शकला नाही. त्यामुळे या प्रकल्पांची कामे संथगतीने सुरू आहेत. 15 व्या वित्त आयोगाअंतर्गत निधी न मिळाल्याने नागपूर महापालिकेवर आर्थिक ताण वाढला आहे.

केंद्र सरकारचा निधी मिळण्यासाठी महापालिकेला काही पावले उचलणे बंधनकारक आहे. त्याची पूर्तता महापालिका करू न शकल्याने विकास निधी केंद्राने वितरित केला नाही. ही बाब 16 व्या वित्त आयोगाच्या बैठकीत समोर आली. नागपूर महापालिकेने आवश्यक तरतुदींची पूर्तता न केल्याने केंद्र सरकारकडून 270 कोटींचा निधी मिळण्यास अडचणी निर्माण झाल्या आहेत. त्याचा परिणाम शहरात सुरू असलेल्या विकासकामांवर होत आहे.

केंद्राच्या अनेक प्रकल्पातील निधीचा काही वाटा महापालिकेला द्यायचा आहे. यामध्ये पोहरा नदीला प्रदूषणमुक्त करण्याच्या 900 कोटींच्या प्रकल्पात महापालिकेचा वाटा 50 टक्के म्हणजे जवळपास 479 कोटी इतका आहे. त्यासाठी महापालिका जवळपास 450 कोटींचे कर्ज घेणार आहे. हा प्रकल्प तीन वर्षात पूर्ण करायचा आहे. त्याचबरोबर नागनदी प्रदूषणमुक्त करण्याच्या 1 हजार 927 कोटींच्या प्रकल्पात महापालिकेचा वाटा केवळ 15 टक्के म्हणजे 290 कोटी इतका आहे. तर या प्रकल्पासाठी जवळपास आठ वर्षांची कालमर्यादा आहे. त्यामुळे या प्रकल्पासाठी लागणाऱ्या निधीचे नियोजन करण्यासाठी महापालिकेला मोठा कालावधी मिळणार आहे. भविष्यात नागपूरला मिळणाऱ्या केंद्र पुरस्कृत प्रकल्पातील महापालिकेला अदा कराव्या लागणाऱ्या निधीचा वाटा कमी करण्याची मागणी केली आहे.

15 व्या वित्त आयोगाअंतर्गत केंद्राकडून महापालिकेला स्वच्छ हवा गुणवत्ता कार्यक्रमासाठी 243.70 कोटी, तर पाणी व स्वच्छता योजनेसाठी 357.27 कोटी मंजूर झाले होते. यामध्ये स्वच्छ हवा अंतर्गत केवळ 132.60 कोटींचा निधी प्राप्त झाला, तर पाणी आणि स्वच्छतेअंतर्गत 198.44 कोटी मिळाले. हा सर्व निधी महापालिकेची मुदत संपण्यापूर्वी म्हणजे 4 मार्च 2022 च्या आधी मिळाला आहे. तर या दोन्ही प्रकल्पाअंतर्गतचा उर्वरित 270 कोटींचा निधी तेव्हापासून मिळालेला नाही.

# रमाईला अभिवादन करून कोकण दौरा डॉक्युमेंटरीचे प्रदर्शन





**नागपूर :** आईसाहेब रमाई यांना पुष्प अर्पण करून दीप प्रज्वलन करण्यात आले. रत्नसुत बुद्ध विहार दिघोरी नागपूरने कोकण दौरा आयोजित करण्यात आला होता. तेरा दिवसाच्या दौऱ्याचे वर्णन डॉक्युमेंटरीमध्ये करण्यात आले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने विविध अनुयायी नव्या जोमाने नव्याने अभ्यासाला लागलेले आहे हीच या अभ्यास दौऱ्या मागची प्रेरणा होती. अभ्यास दौऱ्यासाठी कल्याण मित्र देविदास बांबोर्डे यांनी त्यांच्या संकल्पनेतून महाराष्ट्र अभ्यास दौऱ्याचे आयोजन केलेले होते. अभ्यास दौऱ्यामध्ये विविध जाती धर्मातील लोकांनी सहभाग घेतलेला होता. विशेषतः रमाईचे जन्मगाव वनंद ते हिरवे बाजार हे आदर्श ग्राम या अंतर्गत येणारे सर्व प्रेरणास्थळ या अभ्यास दौऱ्यामध्ये घेण्यात आले होते. मुंबई, कान्हेरी लेणी, अजिंठा, वेरूळ, बेडसे, कार्ले भाजे, महाड, राजगृह दादर, मुंबई गेटवे ऑफ इंडिया, पुणे सिम्बॉयसिस डॉ. बाबासाहेब आंबेडकर संग्रहालय, सावित्रीबाई फुले जन्मगाव नायगाव, सातारा, तळेगाव दाभाडे पुणे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा बंगला आणि भीमा कोरेगावसह विविध ठिकाणे अभ्यासाकांनी अभ्यासात्मक दृष्टिकोनातून पाहून आपल्या समाजाला आपले काहीतरी देणे आहे हा या मागचा उद्देशच होता. आजच्या 27 मे आई रमाई यांच्या स्मृतिदिनाला कोकण दौरा या डॉक्युमेंटरीचे उद्घाटन दैनिक बहुजन सौरभचे कार्यकारी संपादक विलास गजभिये यांनी यांच्या हस्ते करण्यात आले. या डॉक्युमेंटरी दाखविण्यात आली. डॉक्युमेंटरी पाहिल्यानंतर अनेकांनी आपले विचार व्यक्त केले. विलास गजभिये, प्रा. सुभाष शेंडे यांनी प्रामुख्याने माता रमाई यांच्या जीवन आणि कार्याबद्दल आणि आपल्याला यापासून काय प्रेरणा मिळाली यावर विशेष मार्गदर्शन केले. सहभागीनी आपला अनुभव सांगितला. अभ्यास दौरा मागील भूमिका कल्याण मित्र देविदास बांबोर्डे माजी आयुक्त यांची होती असे सहभागी असणाऱ्या अभ्यासाकांनी आवर्जून सांगितले. अनुसयाबाई सभागृहात कोकण टूर डॉक्युमेंटरी दाखविण्यात आली होती. संचालन लता तायडे, 22 प्रतिभा वाचन वर्षा नितनवरे, पंकज पाटील, अमोल लोखंडे यांचा सत्कार करण्यात आला. आभार शोभा बोबडे यांनी केले. संजीवनी मून, रंजु रंगारी, पुरुषोत्तम गजभिये, प्रियंका नागदेवते आदी उपस्थित होते.

# 'भीम जयंती' हा मराठी चित्रपट 30 मे रोजी संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार



**नागपूर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारावर आधारित भिमजयंती या चित्रपटाची निर्मिती करण्यात आली आहे. या चित्रपटाची शुटींग वर्धा जिल्ह्यातील देवळी, वर्धा, सेलु, सांवगी (मेघे) येथे करण्यात आले असून जवळपास 30 दिवसात चित्रपटाचे चित्रीकरण संपन्न झाले. या चित्रपटामध्ये एक स्त्री आपल्या पतिला कशा प्रकारे चांगला मार्ग दाखवून व मार्गदर्शन करून एक डेव्हलपर्स उद्योगपती कशाप्रकारे बनवते यांचे जीवंत उदाहरण या चित्रपटामध्ये आहे. हा चित्रपट स्त्रीप्रधान असून महान, सामाजिक पारिवारिक असा हा रंगीन चित्रपट असून लोकांना मंत्रमुग्ध करणारा आहे. या चित्रपटामध्ये 4 (चार) गाणी असून संगीतकार बाबा जागिरदार यांनी म्युझिक दिले आहे. गायक स्वप्नील बांदोडकर, रेश्मा सोनवणे, वैशाली सामंत, गायकवाड यांनी गाणी गायली असून याचे पोस्ट प्रोडक्शन शंकुतलम स्टुडीओ मुंबई येथे झाले. चित्रपटाची शुटींग चालू असतांनी लोकेशन्स निवडणे व वेळेवरती काही बदल होत असल्यामुळे लोकेशन्स मिळवण्याकरीता तारेवरची कसरतच झाली आहे. 30 मे 2025 रोजी विदर्भातील सर्व जिल्हयांमध्ये चित्रपट प्रदर्शित होत आहे. या चित्रपटाची निर्मिती उमेश क्रियेशनच्या बॅनरवरती होत असून लेखक निर्मात उमेश म्हैसकर आहेत. यशवंत भांडेकर, उज्वला भांडेकर, वर्षा म्हैसकर, संतोष मेंढेकर यातील प्रमुख कलाकार हर्षवर्धन शिंदे, श्रेय्यानी काशीद, अजय राठोड, उमेश म्हैसकर, रिया पाटील, उत्कर्ष म्हैसकर, प्रशांत तोतला, कॅमेरामॅन युवराज केळवदकर, ॲक्शन डॉयरेक्टर मोहम्मद अली, नृत्यदिग्दर्शक मंगेश देवके, कौसर शेख, गितकार संजय भन्साळ, ऑडीटर वीर प्रसाद, साऊंड डिझायनर चिन्मय परडा, सह दिग्दर्शक मुकुंद पगारे, सीमा सपकाळ, उज्वला रोडगे, साधना रामटेके, अशोक गवळी, सुनिल हिरेखन, या कलाकारानी सुद्धा उत्कृष्ट भूमिका केली आहे. मी या चित्रपटाचा दिग्दर्शक विलास गाडगे म्हणून आपल्या वृत्तपत्राच्या माध्यमातून सर्व जनतेला विनंती करतो आहे की हा चित्रपट थियेटरपर्यंत जावून बघावा व आपल्या भीमजयंती चित्रपटाला उत्कृष्ट प्रतिसाद देण्यासाठी दिग्दर्शक विलास गाडगे यांनी पत्रकार परिषदेत चित्रपटा संदर्भात माहिती दिली.

# गोंदिया सहकारी बँकेच्या निवडणुकीचा बिगुल वाजला



**गोंदिया :** बहुप्रतिक्षित गोंदिया जिल्ह्यात मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीचा बिगुल वाजला. तब्बल 11 वर्षांनंतर बँकेच्या निवडणुका होत आहे. 29 जून रोजी मतदान होणार, गोंदिया जिल्हा बँकेत करिता 20 संचालकांची निवड होणार, 30 तारखेला मतमोजणी होणार आहे. सहकारी बँकेच्या या निवडणुकीत 894 मतदार आपल्या मतदानाचा हक्क बजावणार आहेत, 26 मे ते 30 मे पर्यंत फॉर्म जमा करण्याची कालावधी आहे. गोंदिया जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीचा कार्यक्रम सुमारे 11 वर्षांच्या कालावधीनंतर 26 मे रोजी जाहीर करण्यात आला आहे. या बँकेच्या संचालक मंडळावरील एकूण 20 संचालक पदासाठी 29 जून रोजी मतदान होणार आहे. तर मतमोजणी 30 जून रोजी होणार आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सेवा सहकारी संस्था मतदारसंघातून 8, इतर संस्था मतदारसंघातून 7, महिला प्रवर्गातून 2, ओबीसी प्रवर्गातून 1, अनुसूचित जाती प्रवर्गातून 1 आणि एनटी प्रवर्गातून 1 संचालक निवडले जातील. या निवडणुकीत, सर्व मतदारसंघातील एकूण 894 मतदार 20 संचालकांची निवड करण्यासाठी आपला मतदानाचा हक्क बजावतील. घोषित निवडणूक कार्यक्रमानुसार, बँक संचालक पदासाठी उमेदवारांना 26 ते 30 मे या कालावधीत सकाळी 11 ते दुपारी 3 वाजेपर्यंत निवडणूक निर्णय अधिकारी आणि प्रभारी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्थेच्या उपस्थितीत त्यांचे नामांकन गोंदिया कार्यालयात सादर करता येईल.

# कवी सुभाष राघू आढाव यांची मुंबई जिल्हा संघटक पदी निवड



**चेंबूर :** भारतीय सम्यक क्रांती लोककला प्रबोधिनी (रजि.) या संस्थेच्यावतीने राजकमल सामाजिक भवन, सिद्धार्थ कॉलनी, चेंबूर, मुंबई येथे सदरहू संस्थेचे संस्थापक अध्यक्ष लोकशाहिर वामनराव घोरपडे यांच्या अध्यक्षाते खाली राज्यस्तरीय बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत कवी सुभाष राघू आढाव यांची भारतीय सम्यक क्रांती लोककला प्रबोधिनीच्या मुंबई जिल्हा संघटक पदी निवड करण्यात आली. त्यांना नियुक्तीचे पत्र सदरहू संस्थेचे संस्थापक अध्यक्ष लोकशाहीर वामनराव घोरपडे व महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष भिमशाहिर संभाजी भोरे यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देण्यात आले. सदर बैठकीस भारत वाघमारे, संस्थापक अध्यक्ष राष्ट्रीय रिपब्लिकन पक्ष शिवशक्ती भिमशक्तिचे राष्ट्रीय अध्यक्ष भारत वाघमारे व महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष परशुराम वाडेकर यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. सदरहू बैठकीस बीड, परभणी, अकोला, बुलढाणा, रायगड, लातूर, पुणे, मुंबई, रायगड जिल्ह्यातील आजी माजी संस्थेचे पदाधिकारीही उपस्थित होते. बैठकीचे संचालन भिमशाहिर संभाजी भोरे यांनी केले. बैठकीस प्रकाश शिवशरण, अनिल जाधव, दिगंबर वानखेडे, सुरेश थोरात आदी उपस्थित होते

# 35 देश, 4 आंतरराष्ट्रीय संस्थांसह 'हे' वैद्यकीय शिक्षणात हे आंतरखंडीय केंद्र

## दत्ता मेघे आयुविर्ज्ञान अभिमत विद्यापिठाचा 21 वा स्थापना दिन



**वर्धा :** शिक्षणात भरारी घेणाऱ्या संस्थांची देशात कमी नाहीच. राष्ट्रीय मानांकन होते तेव्हा या संस्थाचा परिचय होतो. पण लहान गावात स्थापन होत आंतरराष्ट्रीय भरारी घेणाऱ्या व मूल्यांकनात उजव्या ठरणाऱ्या संस्था मात्र मोजक्याच. तसेच सावंगी येथील विद्यापीठाबाबत म्हटले जाते. येथील दत्ता मेघे अभिमत विद्यापिठात 35 पेक्षा अधिक देशातील विद्यार्थी शिकत असून वैद्यकीय शिक्षणात हे आंतरखंडीय केंद्र ठरत असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. सावंगी येथील दत्ता मेघे आयुविर्ज्ञान अभिमत विद्यापिठाचा 21 वा स्थापना दिन सोहळा नुकताच झाला. यावेळी विद्यापिठाच्या वाटचालीबाबत तज्ञ व्यक्तींनी आपले मनोगत व्यक्त केले. या विद्यापिठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. संदीप श्रीवास्तव हे म्हणाले की या विद्यापिठात बहुविद्याशाखीय शिक्षण दिल्या जाते. त्यामूळे जागतिक स्तरावर मान्यता लाभल्याने आज या ठिकाणी 35 पेक्षा अधिक देशातील विद्यार्थी प्रत्यक्ष व दूरस्थ पद्दतीने शिक्षण घेत आहे. जॉन्स हॉपकिन्स विद्यापिठ, मेयो क्लिनिक, जागतिक आरोग्य संघटना तसेच पन्नासहून अधिक आंतरराष्ट्रीय संस्था संशोधन व अन्य उपक्रमांसाठी या विद्यापिठाची संलग्न झाल्या आहे. माजी कुलगुरू डॉ. राजीव बोरले म्हणाले की वर्धा व नागपूर परिसरात वैद्यकीयसह 10 विविध शाखेचे अभ्यासक्रम चालविल्या जातात.

# कामावर बराच काळ अनुपस्थित राहणाऱ्यांसाठी न्यायालयाचा निर्णय



**नागपूर :** जर तुम्ही बराच दिवस कार्यालयात अनुपस्थित राहता. अनुपस्थितीबाबत तुमच्याकडे वैध कारण नाही तर मग तुमच्यासाठी ही धोक्याची घंटा आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने याबाबत महत्वपूर्ण निर्णय दिला. एखादा कर्मचारी न सांगता बराच काळ कामावर गैरहजर राहत असेल तर या कृत्याला राजीनामा दिला असेच म्हणता येईल, असा निर्वाळ मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने एका प्रकरणाचा निर्णय देताना दिला. कर्मचारी कोणत्याही वैध कारणाशिवाय दीर्घकाळ कामावर गैरहजर राहत असेल तर या कृतीचा अर्थ कर्मचाऱ्याने स्वतःहून नोकरीचा राजीनामा दिला, असे गृहित धरला येईल, असे न्यायालयाने स्पष्ट केले. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज टेक्निकल ॲण्ड एज्युकेशन सोसायटीच्या प्रकरणामध्ये हा निर्णय दिला. न्या. अनिल पानसरे यांच्या एकल खंडपीठाने हा निर्णय दिला. सोसायटीच्या काही कर्मचाऱ्यांनी ऑगस्ट-1993 मध्ये संप जाहीर केला होता. औद्योगिक न्यायालयाने त्या संपाला स्थगिती देऊन कर्मचाऱ्यांना संपापासून दूर राहण्याचे निर्देश दिले होते. असे असताना कर्मचारी कामावर परत गेले नाही. त्यामुळे संस्थेने त्यांना विविध तारखांना पत्रे पाठवून कामावर परत येण्याची विनंती केली होती. त्याचाही काहीच फायदा झाला नाही. त्यानंतर संस्थेने कर्मचारी कामावर परतले नाही तर, त्यांनी स्वतःला स्वेच्छेने सेवामुक्त करून घेतल्याचे समजले जाईल, असा इशारा दिला होता. तेव्हा देखील कर्मचाऱ्यांनी कामावर जाणे टाळले. त्यामुळे, 1 जून 1994 पासून 12 कर्मचाऱ्यांना सेवेतून कमी करण्यात आले.


# स्टुडिओ किरायाने देणे आहे



दैनिक बहुजन सौरभने एक उत्कृष्ट दर्जाचा स्टुडिओ तयार केलेला आहे. बेरोजगार विद्यार्थ्यांसाठी एक आठवड्याचा मोफत कोर्स करण्याचा मानस आहे. ज्या कोणाला नाटक, गाणी, कराओके किंवा फेसबुक रिलवर टाकणारी कोणतीही माहितीसाठी स्टुडिओचा वापर करायचा असल्यास तासाप्रमाणे भाड्याने देणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क साधावा.



मो. 8482839451


बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एम.आय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648